# श्री साईलीला



बाबा भक्तांकडून भिक्षा घेताना



O.D.NERO

जानेवारी ]

किं. ६० पैसे

[ १

# श्री साईलीला

## लेखक-कवी सहावे स्नेहसंमेलन—शिरडी १९८०

श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे सहावे स्नेहसंमेलन श्रीक्षेत्र शिरडी येथे शनिवार ता. ९ व रविवार ता. १० फेब्रवारी १९८० रोजी भरविण्यात येत आहे. या दोन दिवसांच्या स्नेहसंमेलनात श्रीबाबांचे जवळून दर्शन सुख, मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परस्पर परिचय, श्रीसाईलीला विकासाच्या दृष्टीने चर्चा व विचारविनिमय, परिसंवाद, श्रीसाईबाबा विषयक हवे ते विचारा ही सामान्य ज्ञानाची रंजक चर्चा इ. इ. असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला गेला आहे.

या स्नेहसम्मेलन प्रसंगी फक्त श्रीसाईलीलेच्याच लेखक-कवींना निमंत्रित केले जाणार असल्याने गेल्या पाच वर्षात कमीत कमी निदान तीन वेळा तरी आपले गद्य किंवा पद्य साहित्य श्रीसाईलीलेत प्रसिद्ध झालेले आहे, अशाच लेखक-कवींना निमंत्रित केले जाईल. हे नियंत्रण-बंधन पाळून श्रीसाईलीलेच्या ज्या लेखक-कवींना स्नेहसम्मेलनास हजर रहाण्याची इच्छा असेल त्यांनी याच अंकात मलपृष्ठ क्रमांक ३ वर दिलेला तक्ता बॉलपेननेच लिहून तो भरून खाली दिलेल्या पत्यावर १६ जानेवारी १९८० चे आत पाठवावा. तो येताच त्यांना रितसर अधिकृत निमंत्रण कार्ड रवाना केले जाईल. ३० जानेवारी १९८० नंतर त्या संमेलनाचे बाबतीत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. संमेलनास येणाऱ्यांनी ८ फेब्रुवारी पूर्वी येऊ नये.

संमेलनास हजर रहाणाऱ्यांची निवास चहापान, व भोजन-प्रसादाची सारी व्यवस्था श्री साईबाबा संस्थानतर्फे केली जाईल. तक्ता पाठविण्याचा पूर्ण पत्ता—

श्री. क. हि. काकरे, कोर्टरिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी,
जि. अहमदनगर, ता. कोपरगाव, पो. शिरडी ४२ ३१ ०९

निमंत्रक

डॉ. श्री. दि. परचुरे
श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यवाह

श्री. क. हि. काकरे
कोर्टरिसिव्हर
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

धन्य धन्य शिरडी स्थान ।
धन्य द्वारकामाई भुवन ।
जेथे श्रीसाई पुण्यपावन ।
आनिर्वाण वावरले ॥ १ ॥

धन्य धन्य शिरडीचे जन ।
जयालागीं इतुक्या लांबून ।
जेणें कवण्याही निमित्तें येऊन ।
ऋणी करून ठेविलें ॥ २ ॥

गाव शिरडी आधीं लहान
साई सहवासें झाला महान ।
त्याचेनि झाला अति पावन ।
त्याचेनि तीर्थपण तयाला ॥ ३ ॥

त्या शिरडीच्या बायाही धन्य ।
धन्य त्यांची श्रद्धा अनन्य ।
न्हातां दळितां कांडितां धान्य ।
गाती असमान्य साईतें ॥ ४ ॥

धन्य धन्य तयांचें प्रेम ।
गीतें गाती अत्युत्तम ।
एकेतां तयांतील कांहीं अनुत्तम ।
होतसे उपरम मनास ॥ ५ ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ३९ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे] जानेवारी १९८० [अं. १०

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका — जानेवारी १९८०


१) संपादकीय —परमेश्वराचा साक्षात् अवतार श्रीसाईबाबा

२) श्रीदादामहाराज झुरळे —सदानंद चेंदवणकर

३) थोर साईभक्त श्री. कमल अदीब — —श्रीसाईनंद

४) बाबा आमचे परम दैवत —श्री. सुरेंद्र शा. जयकर

५) अपूर्व लाभ —सौ. उषा अधिकारी

६) बाबा गेले आमचा त्राता गेला —श्रीकृष्ण कोठारे

७) हरवलेली बॅग सापडली —स. व्यं. कुलकर्णी

८) श्रीसाई अवतार —श्री. चकोर आजगांवकर

९) श्री बाबांच्या भेटीचा आनंद — श्री. ग. ज. चितांबर

१०) बाबांनी कुलूप उघडले —श्री. डी. आर. खडके

११) श्रीबाबा आणि आमचा चंदन —सौ. शुभदा स. चुरी

१२) एक महत्त्वपूर्ण पत्र —न्यायालयधारक श्री. क. हि. काकरे

१३) शिरडी वृत्त — ऑक्टोबर ७९ —

संपादकीय –

स. न. वि. वि.

# परमेश्वराचा साक्षात् अवतार श्रीसाईबाबा !

महामुनी गौतमांनी दीर्घ तपश्चर्या केली आणि स्वर्गातली गंगा पृथ्वीतलावर आणली. जी स्वर्गात होती तीच पृथ्वीवर अवतरली. स्थान बदललं. गंगा जशी स्वर्गात होती तशीच ती भूतलावर वहात राहिली. भूतलावर ती अवतरली, उतरली, अवतीर्ण झाली. असं अवतीर्ण होणं म्हणजेच अवतार घेणं. गंगेला हा नवा अवतार घेताना कैलासाधिपतीच्या जटांचा आश्रय घ्यावा लागला. गंगेचा तो आवेग, ती महान शक्ती सावरून धरण्याची समर्थता फक्त त्या जटातच होती. ही जर गंगेची अवतरण स्थिती, तर प्रत्यक्ष परमेश्वरानंच अवतीर्ण व्हायचं झालं तर आश्रय घ्यायचा कोणता? तो स्वतः सर्वशक्तिमान. ती प्रचंड शक्ती स्वतःच्या ठिकाणी सामावून घेणारी व्यक्ती तितकीच शक्तिशाली आणि सामर्थ्यवान असायला हवी. अवतार घेताना परमेश्वर अशाच महान सामर्थ्यवान व्यक्तीची निवड करतो. त्या व्यक्तीच्या ठिकाणी परमेश्वराची शक्ती सामावली जाते. रोमरोमी भरून राहते. एखाद्या बंदुकीच्या गोळीत, एखाद्या बाँबमध्ये किंवा त्या अणूमध्ये प्रचंडपणे सामावलेली असते तशी म्हणजे आवरण मानवी आणि अवतरण दैवी. पण या मानवाच्या ठिकाणी तरी ही प्रचंड शक्ति स्वतःत सामावून घेण्याचे महान सामर्थ्य येतं कुठून ? कसं ? काय केल्यानं ?

परमेश्वर जसा सर्वशक्तिमान, तसाच तो सर्व गुणसंपन्नही आहे. सर्वगुणसंपन्न असणारा तो गुणांचा चाहता असणारच. आपण जितके अधिक गुण अंगी बाणवू तितके आपण त्याचे अधिक लाडके होऊ. त्याला अधिक अधिक जवळचे वाटू लागून तो आपल्याला जवळ घेईल. सान्निध्यात ठेवील. आपण उन्नत होऊ. परमेश्वराशी आपलं अद्वैत निर्माण होईल. आपण म्हणजे परमेश्वराची प्रतिकृतीच बनू. असे हे अद्वैत निर्माण होण्यासाठी जे गुण अंगी बनवावे लागतात; ते गुण नेमके कोणते ? आपली प्रत्येक क्रिया, प्रत्येक कृती, प्रत्येक आचार आणि प्रत्येक विचार म्हणजे एकेक गुणच. पण याच क्रिया, कृती, आचार आणि विचार केवळ स्वार्थी बुद्धीनं झाले तर ते गुण, गुण राहात नाहीत. मिठाचा खडा पडल्यावर दूध नासावे तसे ते गुण नासतात. नाश पावतात. त्यांना दुर्गंधी सुटते. अशावेळी त्याना दुर्गुण ही संज्ञा मिळते. पण तेच गुण जर निस्वार्थीपणे परमार्थ कार्यासाठी, पर दुःख निवारणासाठी,

परमात्म्याच्या निस्सीम सेवेसाठी व्यतीत झाले तर नुसतेच सद्‌गुण बनत नाहीत तर ते दैवी गुण ठरतात, आणि हे दैवी गुणच आपल्याला परमेश्वराच्या सन्निध घेऊन जातात. सद्‌गुण पुष्कळांच्या जवळ असतात. निदान एखादा तरी सद्‌गुण प्रत्येका-जवळ असतोच. पण तो दैवी गुण बनण्याइतका निस्वार्थ नसतो. प्रत्येक सद्‌गुण आपल्या स्वतेजानं झगमगतो. इतरांना आकलन होईपर्यंत त्या सद्‌गुणाचं तेज चमकतं. लोक त्या सद्‌गुणाची वाखाणणी करतात. परंतु ज्याच्या अंगी तो सद्‌गुण आहे त्याला मोठेपणा मिळतोच असं नाही. जर त्या सद्‌गुणाचा वापर स्वार्थासाठी होत असेल तर त्यात मोठेपणा कसला ?

ज्यानं विजेच्या दिव्यांचा शोध लावला त्या एडिसनची एक गोष्ट सांगतात. एडिसनच्या कुटुंबियांपैकी कुणीतरी पोटदुखीनं तडफडत होतं. पोटशूळ परमावधीला जाऊन ती व्यक्ती गडबडा लोळू लागली. वेळ संध्याकाळची. अजून सबंध रात्र जायची. ही पोटदुखी वाढतच गेली तर ?...एडिसन तावडतोब बाहेर पडला. डॉक्ट-रांना घेऊन आला. डॉक्टरांनी रोग्याला तपासलं. म्हणाले 'ऑपरेशन तावडतोब झालं नाही तर रोगी दगावण्याचा धोका आहे. परंतु आता या संध्याकाळच्यावेळी ऑपरेशन करणे कसं शक्य आहे ? त्यासाठी भरपूर उजेड हवा. सकाळपर्यंत थांबणं भाग आहे. अर्थात् सकाळपर्यंत रोगी जगला तरच मला ऑपरेशन करता येईल.' एडिसननं खूप विचार केला. डॉक्टर निघून गेल्यावर त्यानं घरात होत्या नव्हत्या तेवढ्या मेणबत्त्या बाहेर काढल्या. बऱ्याचशा शेजाऱ्या पाजाऱ्याकडून आणल्या. मोठेमोठे आरसे जमा केले. सर्व खोलीभर आणि वर छतालाही ते लावले, आणि त्या असंख्य मेणबत्त्या त्यानं एकाच वेळी लावल्या. लख्ख प्रकाश पडला. कोन्या-कोपऱ्यातून परावर्तित झाला. जणू सूर्यप्रकाशच. धावत जाऊन डॉक्टरांना तो पुन्हा घेऊन आला. डॉक्टर आश्चर्यचकित झाले. उजेड भरपूर होता. डॉक्टरांनी तावडतोब ऑपरेशन उरकलं. यशस्वीपणे ते पार पडलं. मेणबत्तीच्या प्रत्येक ज्योतीत दुसऱ्या-साठी जळत राहण्याचा दैवी गुण. असे हजारो दैवी गुण एका खोलीत एकवटले आणि महान तेजाचा अवतार झाला. अवतार जगाच्या कल्याणासाठीच होतात. 'संभवामि युगे युगे' असं भगवान श्रीकृष्णानं गीतेत सांगितलंच आहे. तेजाच्या त्या अवतारानं एडिसनला प्रेरणा दिली आणि त्याच्याद्वारे विजेच्या दिव्यांचा शोध लावला. त्या शोधामुळं जगाचं कल्याण झालं.

सद्‌गुरू श्रीसाईबाबांच्या अंगी असलेला प्रत्येक गुण दैवी गुण होता. बाबांचा देह अशा गुणांचा एक संचच होता, आणि म्हणूनच परमेश्वराशी त्यांचं अद्वैत निर्माण

झालं होतं. त्यांच्या देहातच परमेश्वर अवतीर्ण झाला होता. जगाच्या कल्याणासाठी प्रत्यक्ष परमेश्वरानंच त्यांच्या ठिकाणी अवतार घेतला होता. साऱ्या मानवजातीशी त्या अवतारानं अशाप्रकारे संपर्क साधला. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी सर्व धार्मियानी बाबांना अवतार मानलं. आपली दुःखे घेऊन ते बाबांकडे गेले. बाबांनी साऱ्यांची दुःखं निवारण केली. जो जो बाबांना शरण गेला तो तो व्याधिमुक्त झाला. समाधान पावला.

नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ शोधीत राहाण्यापेक्षा त्यांचा व्याप आणि विस्तारच लक्षात घेतला पाहिजे. बाबांचं कूळ कोणतंही असो त्यांचा व्याप थक्क करून टाकणारा आहे. चरणापाशी आलेल्या भक्ताच्या मनातले हेतू त्याने ते बोलून दाखविण्यापूर्वीच ओळखणे. शेकडो मैल दूर असलेल्या भक्तांची संकटं बसल्या जागेवरून जाणणं आणि ती दूर करणं. तेलावाचून पणत्यातील ज्योती प्रज्वलीत ठेवणं. ह्या आणि अशा कित्येक गोष्टी बाबांच्या ठिकाणी असलेल्या दिव्यत्वाची साक्ष पटवतात. त्यांच्या दिव्यत्वाची प्रचीती येते, आणि अशी दिव्यत्वाची प्रचिती येते तिथे आणि तेव्हाच कर जुळतात. आदरानं मस्तक तेव्हाच नम्र होतं की जेव्हा देवत्व प्रत्ययास येतं. बाबांनी तो प्रत्यय दिला आहे. म्हणूनच ते प्रत्यक्ष देव आहेत. एक अवतारच आहेत.

॥ जय जय सद्गुरू श्रीसाई—
जय जय जय जय गुरुमाई ॥


# श्री साईलीला

**सहावे लेखक-कवी स्नेहसंमेलन—**

शिरडी येथे दि. ९ आणि १० फेब्रुवारी १९८०

अध्यक्षा—श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे, (इचलकरंजीकर)
भूतपूर्व राणीसाहेब, संस्थान इचलकरंजी

प्रमुख पाहुणे—श्री. प. पू. राधाकृष्ण स्वामी,
अध्यक्ष : अखिल भारतीय श्री साई समाज, मद्रास

परम दत्तभक्त सत्पुरुष

# श्री. दादा महाराज झुरळे

— सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला,

● मुंबापुरीमध्ये शुद्ध दत्तभक्तीचा प्रचार-प्रसार करणारी जी सद्‌गुरुभक्त गुणी मंडळी आहेत त्यामध्ये वडाळा विभागात रहाणारे श्री. दादा महाराज झुरळे यांना अग्रक्रम द्यावा लागेल. गेली २१ वर्षे दादामहाराज दत्त संप्रदायाचा प्रचार अक्षरशः निःस्वार्थी वृत्तीने करीत आहेत. या बहुभाषाभाषी नगरीमध्ये त्यांची चांगली पाचशेवर भक्तमंडळी असून त्यामध्ये सारखी भरच पडत आहे.

श्री. दादा महाराज मूळचे कोल्हापूरचे, कोल्हापूरची अंबाबाई हे त्यांचे दैवत. त्यांचे संपूर्ण नाव वसंत नरहर झुरळे. त्यांचे वडील श्री. नरहरपंत हयात असून ते एकाकाळी वांद्रा नगरपालीकेत कारकून होते. १९५७ साली ते सेवा निवृत्त झाले. दादांच्या वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्या मातोश्री गंगाबाई या स्वर्गवासी झाल्या. दादांचे प्राथमिक मॅट्रिक पर्यंतचे सारे शिक्षण कोल्हापूरच्या न्यू हायस्कूलमध्ये झाले. १९४० साली ते त्या शाळेतून मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. कॉलेजमध्ये ते गेले नाहीत तर त्याऐवजी त्यांनी अकाउंटनसी बुककिपिंगचा अभ्यास केला व १९४१ साली लंडन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे होणाऱ्या परीक्षा देण्यासाठी म्हणून ते मुंबईला आले ते कायमचेच. या परीक्षा ते ७० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. पुढे १९४१ ते ४४ पर्यंत ते वांद्रा येथे पाटकर कॉनट्रॅक्टर यांचेकडे नोकरीस राहिले होते.

पुढे लंडन चेंबर ऑफ कॉमर्सच्याच बिझिनेस कॉरसपॉंडंटस, कमर्शियल कॉरसपॉंडंटस, बुककिपिंग, टाईपरायटींग या परीक्षा पण त्यांनी दिल्या. कॉमर्स आणि फायनान्स या परीक्षा तर द्वितीय श्रेणीत ते उत्तीर्ण झाले, सेल्समनशिपची परीक्षाही ते ७० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले, व हे सगळे झाल्यावर नरहरपंत साहित्याकडे वळले. महाराष्ट्र साहित्य परीषदेची 'साहित्य विशारद' ही पदवी त्यांनी १९४७ साली मिळविली व १९४९ साली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची 'वाङ्मय विशारद' ही पदवी पण मिळविली. नंतर साहित्यातील श्रेष्ठ अशी 'वाङ्मय पारंगत' या परीक्षे-साठी 'श्रीदत्त संप्रदाय उपासना व कार्य' हा विषय त्यांनी निवडला. यासाठी त्यांनी स्वतः पुस्तके निवडली, मनापासून अभ्यास केला. टिपणे स्वतंत्रपणे काढली; व अतिशय सुंदर असा निबंध परीक्षक मंडळाला सादर केला. साहित्याचा हा



प. पू. श्री. दादा महाराज झुरळे

असा अभ्यास करीत असतानाच १९५० च्या सुमारास प. पू. गुळवणी महाराजांनी प. पू. टेंब्ये स्वामी यांच्या विषयीच्या साहित्याचा एक संच ५१ रु. विक्रीस ठेवला होता. त्याचा अभ्यास करीत असतानाच गुळवणी महाराजांचे एक पत्र त्यांना आले, त्यात त्यांनी या वाङ्मयाचा प्रचार मुंबईत व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली. नरहरपंतांनी गुळवणी महाराजांचे पत्र शिरसावंद्य मानून दत्तभक्तीचा प्रसार प्रचार करताना टेंब्ये स्वामींच्या साहित्याचाही प्रचार करण्याचे निश्चित केले. ३०० प्रवचने त्यांनी दोन वर्षांत आयोजित करून ती यशस्वी केली व त्यामधून टेंब्ये स्वामींच्या साहित्याचा प्रसार केला. यामुळेच की काय नरहरपंताना भाविक जनता 'दादा-महाराज' या नावाने ओळखू लागली.

पुढे दादा महाराजांनी आपल्या प्रचार कार्यासाठीच श्रीनृसिंह सरस्वती सेवामंडळ या नावाची संस्था काढली व १९५७ साली रामनवमीच्या सुमुहूर्तावर श्रीदत्तात्रयांवर दोनपानी प्रथम प्रकाशन प्रकाशित करून ते भक्तांना वाटले. तेव्हापासून तो आजतागायत २२ वर्षे श्रीदादा महाराज श्रीदत्तवाङमय प्रचाराचे कार्य निस्वार्थीपणे करीत आहेत. आजपर्यंत त्यांनी आरती संग्रह, श्रीगुरु प्रसाद श्रीदत्तात्रेय उपसना मार्ग, श्रीदत्तात्रेय सिंधु, श्रीसप्तशती गुरुचरित्र, श्रीदत्तात्रेय कल्प, श्रीविज्ञानसागर इ. पुस्तकांचे प्रकाशन करून त्याचप्रमाणे श्रीदत्तमहाराज व श्री जगदंब यांची छायाचित्रे छापून घेऊन सर्व साधकानाच नव्हे तर अखिल भारतात सर्व धार्मिक ग्रंथालयांना विनामूल्य देण्याचे फार मोठे कार्य केले आहे. आतापर्यंत ७०० पानांचे वाङ्मय त्यांनी भक्तांना मोफत पुरविले आहे. याशिवाय श्रीदत्त महात्म्य, श्रीदत्त प्रबोध, श्रीदत्त पुराण हे तीन अद्वितीय महान ग्रंथ शुद्ध छापून घेऊन ते अत्यल्प किंमतीला भक्तांना दिले आहेत. श्री. दादा महाराज छुरळे यांचे हे कार्य महाराष्ट्रातील भाविक व श्रद्धाळू जनता कधीच विसरणार नाही.

श्री. दादा महाराज यांच्या निवासस्थानी श्रीदत्त अवतारांच्या मोठ्या आकारातील सुंदर तसबिरी आहेत. दत्त सांप्रदयातील सर्व उत्सव तिथे साजरे होतात. शिवाय दर गुरुवारी व शनिवारी तिथे सोहळे होतात. गुरुवारी सायंकाळी ७ पासून १० वाजेपर्यंत ध्यानाचा वर्ग, नामस्मरण, जप-जाप्य, विवेचन, आरती-प्रसाद इ. कार्यक्रम होतात तर शनिवारी श्रीनृसिंह वाडीतील श्रीदत्त महाराजांच्या पुढे होणाऱ्या पालखीप्रमाणेच त्यांचेकडे पालखी सोहळा होतो. दर रविवारी एखाद्या साधक भक्ताकडे श्रीसत्यदत्त किंवा श्रीसत्यअंबा यांच्या पूजा केल्या जातात त्यासाठी श्रीदादांनाच आमंत्रित केले जाते त्यामुळे रविवारीही दादा महाराज संपूर्ण पणे गुंतलेले असतात.

श्रीदत्त वाङ्मयाचा प्रसार प्रचार करत असतानाच एका पहाटे प. पू. श्रीदत्तात्रयांनी दादामहाराजांना स्वप्नात दर्शन दिले व आपल्या भक्तांना साधना देण्याची

आज्ञा केली. तेव्हापासून ते भक्तांना साधना देत आले आहेत. रोज कुणीना कुणी-तरी नवीन साधक त्यांचेकडे येतोच येतो. महाराजांच्या साधना मार्गदर्शकापासून त्या साधकास शांतता, समाधान व मानसिक शांती यांचा लाभ झालेला आहे.

श्रीदादा महाराज दोन उपासनांचा प्रचार नेहमी करतात. एक म्हणजे श्रीदत्ता-त्रयांची व दुसरी श्रीभगवतीची. करवीर निवासीनी श्रीमहालक्ष्मीची एक स्वतंत्र वही करून त्यात 'श्रीदत्त' व 'जय जगदंब' हे जप अनुक्रमे रोज ७०० व ३०० वेळा लिहिण्यास ते सांगतात. श्रीमहालक्ष्मी अष्टक स्तोत्र रोज १०० वेळा वाचावयास सांगतात. ही उपासना साधक नियमितपणे करतात की नाही, करत नसल्यास का करीत नाही. केल्या जाणाऱ्या उपासनेत कोणत्या अडीअडचणी येतात त्या दूर कशा करता येतील यावर दादांचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळे साधकांच्या कडून शुद्ध उपासना तर होतेच व त्याचा परिणाम म्हणजे साधकाच्या जीवनात सर्वांगीण उन्नती झाल्याची प्रचिती येते. दादांची उपासना दोन विभागात विभागली गेली आहे. गुरुपौर्णिमा ते दत्तजयंती व दत्तजयंती ते गुरुपौर्णिमा या काळात साधकांनी आपली उपासना पूर्ण करावयाची असते. श्रीदादा महाराज साधारणतः वर्षातून एकदा तीर्थयात्राही करतात व ती पण आपल्या साधकांच्या बरोबर.

श्रीदादा महाराजांनी हे सारे करीत असतानाच १९४५ साली इनकमटॅक्स कचेरीत नोकरी पकडली व आज ते ट्रस्टसर्कल विभागात सुपरवायझर म्हणून काम पहातात. आतापर्यंत त्यांनी हजारो लोकाना उपासना दिली आहे. साधना व उपासना ही दोन महत्वपूर्ण अंगे दादांच्या निवासस्थानी अव्याहतपणे चालू असतात.

श्रीदादामहाराजांचा विवाह १९४८ साली झाला. त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या बार्शीच्या कु. कुलकर्णी व आताच्या सौ. लक्ष्मी आई म्हणून भक्तांना परिचित आहेत. देवदत्त व अविनाश असे दोन पुत्र त्यांना असून त्यांची कन्या विवाहित आहे. काही वर्षापूर्वी दादामहाराज नोकरीवर जात असताना वाटेत मांजराने केलेल्या ओकारीवर पाय पडून ते घसरले. त्यामुळे त्यांच्या हातापायाच्या हाडांना चांगलीच दुखापत झाली. हाडे सांधली जाईतोपर्यंत त्यांना इस्पिळात पडून रहावे लागले खरे; पण तिथेही त्यांनी आपला वेळ सत्कारणी लावला. तिथेही त्यांनी भक्तांना उपासना दिली. आज दादामहाराज काहीसे अधू झाले असले तरी नोकरीवर नियमितपणे जातात व नित्यनियमाने श्रीदत्त भक्तांना साधना, उपासना देतात व या कार्यातच आपला दैनंदिन वेळ व्यतीत करतात. श्रीदत्त प्रभू श्रीदादामहाराजांसारख्या निस्वार्थी, त्यागी कर्मयोग्याला उदंड आयुष्य देऊन सतत कार्य करण्याची प्रेरणा व स्फूर्ती देत राहो हीच प्रभू चरणी प्रार्थना. ०००

# थोर साईभक्त श्री. कमल अदीब

—श्री साईनंद



श्री. कमल अदीब

● मुंबापुरीत आलीशान पंचतारांकीत अशी जी मोठाली हॉटेले आहेत त्यामधे सांताक्रूझ विमानतळासमोरचे सेंटॉर हॉटेल हे एक जंगी हॉटेल आहे. या हॉटेलच्या तळमजल्यावर वस्त्रे-भूषणे प्रावरणादिकांच्या शोकेसेस आहेत, विचारपूस करण्याचे चौकशी इपीस आहे. आणि एका बाजूला या हॉटेलच्या एका बड्या अधिकाऱ्याची कचेरी पण आहे. या अधिकाऱ्याच्या कार्यालयात नुसते डोकावून पाहिले तर त्यांच्या हाताखालचा नोकरवर्ग सारखा त्यांच्या कचेरीत जा-ये करीत असतो, व हे अधिकारी प्रत्येक मिनिटाला त्यापैकी कुणाशी ना कुणाशी तरी गडबडीने बोलण्यात गर्क असतात. तेवढ्यात फोनची घंटा घणघणते व बोलणारी मंडळी क्षणभर थांबतात व दूरध्वनी वरून साहेबांचे संभाषण सुरु होते. सकाळी नऊ वाजल्या पासून तो सायंकाळी सहा-सात वाजेपर्यंत तर कित्येकदा मध्यरात्रीपर्यंत अक्षरशः कामगिरीत गर्क असलेल्या या भक्ताचे नाव आहे श्री. कमल अदीब. उंच गोरेपान, गुलाबी गाल व रुबाबदार व्यक्तीमत्वाचे हे अधिकारी या हॉटेलचे एक व्यवस्थापक अधिकारी म्हणून ओळखले जातात. या हॉटेलच्या इतर व्यवस्थापकांना काम व जबाबदाऱ्या किती असतात हे माहित नाही, पण अदीब साहेबांना भरपूर काम असते खास ! पण हे सारे दिवसाकाठचे काम ते साईबाबांचे नाव घेत घेत पूर्ण करतात. अगदी काही सुद्धा शिल्लक ठेवत नाहीत.

सकाळी आपल्या कचेरीत आल्यावर आपल्या टेबलावर असलेल्या श्रीसाईबाबांच्या फोटोफ्रेमला वंदन करून ते कामकाजाला सुरुवात करतात व सायंकाळी घरी जाताना न विसरता बाबांना वंदन करतात.

आपल्या जीवनात श्रीसाईबाबांना अढळस्थान देणारे श्री. कमल अदीब हे मूळ काश्मीरी ब्राम्हण. ८ मार्च १९५० या दिवशी त्यांचा जन्म नवी दिल्ली येथे झाला. त्यांचे वडील श्री. राजेंद्र अदीब हे रेल्वेमध्ये नोकरीस होते. १९७४ साली वयाच्या ६१ व्या वर्षी ते निधन पावले. कमल यांच्या मातोश्रीचे नाव लीला देवी. कमल यांचे शिक्षण विलेपारलेच्या सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये झाले. १९६६ साली ते एस. एस. सी व तदनंतर पार्लेटिळक कॉलेजातून रसायनशास्त्र व जीवशास्त्र हे विषय घेऊन बी. एस. स्सी पदवीधर झाले. लगेच त्यांना मुंबईच्या नरिमन पाईंट जवळच्या ओबेरॉय शेरेटन हॉटेलात नोकरी मिळाली. पण एका संतश्रेष्ठीच्यामुळे त्यांनी ती तेथली नोकरी १९७५ साली सोडली. त्या संतश्रेष्ठीचे नाव आहे. श्री. कमूबाबा. गोरेगावचे हे संत शिरडीच्या साईबाबांचे एक महान भक्त. त्यांचे चक्षुर्वैदर्शन घेतलेले. या कमूबाबांनी अदीब घराण्याचा संपूर्ण कायापालट करून टाकलेला आहे. कमूबाबांनीच या घराण्याला शिरडीच्या श्रीसाईबाबांचा रस्ता दाखविला. ते साडेतीन वर्षांचे असताना प्रथम शिरडीस गेले व तेव्हापासून तो आजतागायत न चुकता शिरडीची वारी करीत आहेत. मनात आले तर चटकन ते बाबांना भेटून वंदन करून येतात.

साईबाबा व कमूबाबा या दोहोंवर या घराण्याची अलोट भक्ती आणि प्रिती; व त्याला कारणेही तशीच जबरदस्त झाली आहे. कमल अदीब आठ वर्षांचे असताना त्यांना चेहेऱ्यावर कुत्रा चावला. इतका जबरदस्त चावला की त्याने त्यांना अक्षरशः रक्तबंबाळ करून टाकले. कमूबाबांनी ताबडतोब आपल्या हातानी त्यांच्या चेहऱ्यावर बाबांची भरपूर उदी फासली; व जा आता इंजिक्शने वगैरे काहीएक घेऊ नकोस बाबांचे नामस्मरण कर. काही एक होणार नाही तुला असे सांगितले. आणि एवढा जबरदस्त कुत्रा चावलेले कमल घरी गेले. चमत्कार असा की त्यांच्या चेहऱ्यावरचे कुत्र्याचे बोचकारे, ओरबाडे यांच्या खाणा खुणा पण राहिल्या नाहीत, कमूबाबांच्या निर्वाणाने या कुटुंबाला अपरंपार दुःख झाले.

कमल अदीबच्या घरातली सारीच जण साईबाबांना अतिशय भजतात. त्यांच्या घरी साईबाबांची एक जंगी फ्रेम आहे व ती एका छानदार लाकडी उंचच उंच मखरामध्ये व्यवस्थितपणे बसविलेली आहे. मोठीच काय पण घरातली मुले पण उठल्यावर बाबांचे दर्शन सुख घेतल्याशिवाय कोणत्याच कामाला सुरुवात करीत नाहीत. गुरुवार व पौर्णिमा हे दोन दिवस त्यांचेकडे अगदी कटाक्षाने एकादशीसारखे पाळले जातात. अगदी संपूर्णपणे शाकाहारी जेवण. एकदा काय झाले. १५ जानेवारी १९७७ सालची गोष्ट. गुरुवार होता. अगदी मध्यरात्रीची वेळ. कमलना दरदरून घाम झाले

होतं. त्याची तीव्रता कमी व्हावी म्हणून त्यांनी अजाणतेपणाने अवघे तीनच चमचे मद्य घेतले, आणि घेतल्यावर मग त्यांच्या लक्षात आले, अरे, आपण चूक केली आज गुरुवार लागलेला आहे. बाबांचा दिवस सुरू झाला आहे. या चुकभूलींचा परिणाम त्यांना चांगला तीन महिने भोगावा लागला आहे. त्याचे असे की त्यांचे प्रमोशन त्याच महिन्यात होते ते चांगले तीन महिने लांबणीवर पडले ! आणि तेव्हापासून मात्र अदीबनी आपल्या खाण्यापिण्यावर बंधन घातले. अगदी न चुकता. कमलना राजीव नावाचा एक मुलगा व विभूती नावाची एक कन्या अशी दोन छोटी आहेत. एकदा गरम पाणी पडून राजीव चांगलाच भाजला. पण त्यांनी त्यावर बाबांची उदी भरपूर फासली व भाजलेल्या जागेला आराम उतार पाडला. घरातल्या मंडळींना कधी काळी बरं नसलं तर त्यांचेकडे डॉक्टर व औषधे नाहीत. बाबांचे स्नानाचे तीर्थ व उदी हीच त्यांची औषधे आहेत, व यामुळे आमचे दुखुणे दूर पळते अशी घरातली सर्वांची श्रद्धा आहे. कमल अदीब यांच्या सुशील पत्नी सौ. आशा देवी या पण बाबांच्या भक्त, १९७४ साली त्यांचा कमलशी विवाह झाला. आपल्या फावल्या वेळात कमल अदीब दांपत्य बाबांच्या भजनाच्या कॅसेटस् व रेकॉर्डस् लावतात व त्यातच आपला वेळ घालवितात. आपणाला लाभलेली ही सध्याची नोकरी केवळ श्रीकमू बाबांच्या आशिर्वादामुळे व श्रीसाईबाबांनी त्यांना दिलेल्या ती स्वीकारण्याच्या प्रेरणेमुळे होय अशी श्री. कमल यांची निष्ठा आहे. मराठी, इंग्रजी, गुजराथी, पंजाबी हिंदी या भाषा श्री. कमल अतिशय सफाईने बोलतात. श्रीबाबांच्या बद्दलची कोणतीही गोष्ट निघाली की ते चटकन क्षणभर आपले काम थांबवितात आणि अगदी भावनावश होऊन बाबांच्या संबंधीच्या बोलण्यात भाग घेतात.

---

## श्रीमती रंगूताई कुलकर्णींचे निधन

श्रीसाईबाबांना अनेकदा पाहिलेल्या रंगूताईंचा व आमचा चांगलाच परिचय होता. त्यांच्या हातचे व त्यांनी वाढलेले पदार्थ आम्ही खाल्ले आहेत. त्या श्रीसाईनाथ रुग्णालयात असताना २८ व २९ आक्टोबर ७९ रोजी आम्ही स्वतः जाऊन त्यांना भेटून त्यांची विचारपूस केली होती. त्यावेळीही मोठ्या प्रेमाने त्या आमचेशी बोलल्या होत्या. श्रीमती रंगूताईंच्या निधनाने साईकाळातील आदर्श व अतिथ्यशील स्त्रीभक्त दृष्टीआड झाली आहे. त्यांचे नातू सर्वोत्तम यांचा आपल्या मातामहीबद्दलचा लेख प्रसिद्ध करून आम्ही रंगूताईंना साश्रूनयनांनी श्रद्धांजली वहात आहोत.

— का. संपादक

सेवानिष्ठ साईभक्त :—

# कै. रंगूताई नारायण कुलकर्णी

— श्री. सर्वोत्तम रं. कुलकर्णी, शिर्डी



श्रीमती रंगूताई कुलकर्णी

श्री साईबाबांच्या नैवेद्य कोठीत सुमारे ३५ वर्षे श्रीसाईबाबांच्या महानैवेद्याचा स्वयंपाक रंगूताईंनी केला. नोकरी ही सेवा आहे हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्यांनी श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष डोळ्याने पाहिले होते. त्या साईबाबांच्या अनेक आठवणी सांगत असत.

कै. रंगूताई ह्या कै. नारायणराव कुलकर्णी यांच्या पत्नी. त्यांचा वयाच्या १० व्या वर्षी विवाह झाला. सुरूवातीला नैवेद्य कोठीत जवळ जवळ ५ ते ६ वर्षे कुठलेही वेतन न घेता त्यांनी महानैवेद्यचा स्वयंपाक केला. सायंकाळी श्रीसाईबाबांना जो झुणका-भाकरीचा नैवेद्य जातो त्याची गोडी अविट असते पण त्यांना जर घरी झुणका करण्यास सांगितले तर त्याला अजिबात चव नसायची. परंतु नैवेद्य कोठीत त्याचीच चव मात्र अविट असायची. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य साईबाबांच्या सेवेत घालविले. त्यांचा एक चमत्कार असा, वयोमानाने त्यांना कायम शारीरीक त्रास होई पण त्या जेव्हा नैवेद्य करण्यास लागत तेव्हा एक प्रकारची शक्तीच त्यांचे अंगात संचारत असे. ती शक्ती साईबाबांनीच त्यांना प्रदान केली होती आणि काम पूर्ण झाल्यावर त्या घरी येत तेव्हा मात्र आजाराने व्याकुळ होत. संपूर्ण अंग, हात, पाय त्यांचे दुखत असत ह्याचे सर्वांनाच आश्चर्य वाटे. त्यांच्याबरोबर सौ. कृष्णाबाई गुरव ह्याही होत्या त्यांनाही याचे आश्चर्य वाटे सौ. कृष्णाबाई त्यांना आपल्या आईप्रमाणे मानत.

शिर्डीतील ग्रामस्थ तसेच नेहमी येणारे साईभक्त त्यांना 'ताई' ह्या प्रेमळ नावाने हाका मारीत. ताईकडे प्रत्येक येणाऱ्यास सारखीच वागणूक मिळे त्या आपल्या मुलाप्रमाणे व मुलीप्रमाणे त्यांना प्रेमाने वागवीत. कै. रंगूताईचे घराणे साईकृपेमुळे अगदी सुखी आहे. श्रीसाईबाबा संस्थानने १९७८ साली त्यांना सेवानिवृत्त केले होते.

कै. रंगूताईंना दोन मुले आहेत. केशव व रंगनाथ ह्यातील श्री. रंगनाथराव कुलकर्णी हे साईबाबा संस्थान मध्येच नोकरी करतात.

कै. रंगूताईंना बाबांचा साक्षात्कार घडला तो असा, त्यांची एक जागा गुरु-पादुकाजवळ ( गुरुस्थान समोर ) होती. त्या जागेची मागणी पुष्कळ भक्तांनी संस्थान-करिता केली. परंतु त्यांनी ती जागा देण्यास नकार दिला. त्या जागेत जितके रुपये एकास एक जोडून ठेवले असता मावतील तितके सर्व रुपये देऊन ती जागा संस्थानकरिता घेण्यास श्रीमंत केशवराव बुटी तयार झाले. तरीही ती जागा देण्यास त्यांनी नकार दिला. नंतर १९४१ साली नारायणराव ( पती ) यांचे निधन झाले व पुन्हा संस्थानने जागेची मागणी केली. त्या ठिकाणी एक सुंदर व सरळ इमारत भक्तांकरिता बांधता आली असती शेवटी संस्थानही श्रीसाईबाबांचे व कुलकर्णीही त्यांचेच वंशपरंपरागत भक्त. तेव्हा दोघांनाही संतोष होईल अशीच गोष्ट घडून यावी असेच जणू काही श्रीबाबांना वाटले, व म्हणूनच की काय १९४४ सालच्या श्राव-णाच्या एके गुरुवारी श्रीबाबा रंगूताईच्या स्वप्नात आले, व त्यांनी जागा देऊन टाकण्यास सुचविले. सकाळीच उठल्यावर त्यांनी आपल्या मुलाला ( केशवराव ) स्वप्नाची कल्पना देऊन जागा देऊन टाकण्यास सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी योग्य मोबदला घेऊन ती जागा संस्थान करिता दिली.

तसेच श्रीसाईबाबा संस्थानने १९५७ ते ५९ दरम्यान ज्या जागा घेतल्या त्या जागेवर रंगूताईंच्या मुलाच्या ( केशवराव ) ओळख साक्षी म्हणून सह्या घेतल्या आहेत. तसेच हल्ली ज्या जागेत शांतीनिवास, पाण्याचे कारंजे, लेंडीबाग आहे ह्या ठिकाणी पूर्वी स्मशानभूमी होती. ती जागा आरोग्याला अत्यंत त्रासदायक होती. ही स्मशानभूमी उठविण्यास रंगूताईंचा मुलगा ( केशव ) ह्याने प्रामुख्याने प्रयत्न केला. शेवटी साईकृपेने त्यांच्या प्रयत्नाला यश आले, व ती जागा मे. कलेक्टरसाहेब अहमदनगर नं. १६५/१७-८-५९ चे हुकुमावरून निकाल लागला व त्या जागेत आज आपण शांतीनिवास पाण्याचे कारंजे, लेंडीबाग पहात आहोत. म्हणजे रंगूता-ईंच्या घराण्यातील सर्वांवर श्रीसाईबाबांचे कृपाछत्र आहे. आजही त्यांच्या जागेवर महानैवेद्याचा स्वयंपाक त्यांची सून सौ. उषाताई कुलकर्णी करीत आहे.

रंगूताईच्या शेवटच्या क्षणी त्यांनी बाबांची उदी व तीर्थ मागीतले. त्याप्रमाणे त्यांना उदी व तीर्थ दिल्याबरोबर त्यांनी तोंडाने 'साईबाबा' असे शब्द उच्चारून आपले प्राण सोडले, व त्या साईचरणी विलिन झाल्या. निधनाचा दिवस होता चतुर्थीचा! बुधवार दि. ६।११।७९ रोजी सायंकाळी ५॥ वाजता! आणि त्या गेल्यावर सर्वत्र दुःखाचे वातावरण पसरले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्षांचे होते.

अशा रितीने एक सेवानिष्ठ साईभक्त कै. रंगूताई नारायण कुलकर्णी शेवटी साईचरणी अनंतात विलिन झाल्या.

ज्याप्रमाणे वाळुवरील पावलांचे ठसे लाटा कधीच पुसु शकत नाहीत त्याप्रमाणे आमच्या मनावरचे 'ताईचे' स्मृतीचे ठसे कालरुपी सागराच्या लाटा कधीच पुसु शकणार नाहीत.

★

# शिरडीचे श्रीसाईबाबा आमच्या घरातील मुख्य दैवत

—श्री. सुरेंद्र शा. जयकर
जॉली कॉटेज को. हौ. सोसायटी
ब्लॉक नं. १६, ४ था मजला भागोजी
कीर मार्ग माहीम, मुंबई १६

---

द्वारकामाईतील श्रीसाईबाबांचे हुबेहूब चित्र चितारणारे साईभक्त कै. शामराम जयकर यांचे चिरंजीव श्री. सुरेंद्र सांगतात—

---

● माझे पूज्य पिताजी श्री. शामराव रामचंद्र जयकर हे एक प्रख्यात चित्रकार होऊन गेले. त्यांनी नोकरी कधीच केली नाही तर निरनिराळ्या त्यावेळच्या संस्थानातून राजघराण्यातील किंवा विशिष्ट अधिकारी व्यक्तींची मोठया आकाराची रंगीत तैलचित्रे काढून आमचा भावंडासहित मातोश्रीसहित इ. स. १८९० ते १९२० पर्यंतचा संसार मोठया धैर्याने चालविला. श्रीसाईबाबांची किर्ती ऐकून आमचे वडील इ. स. १९१४ मध्ये बाबांच्या दर्शनासाठी आम्हा मुलांना घेऊन शिर्डीला गेले. माझे वय केवळ ४॥ वर्षांचे होते. पण मला "बाबांची ती बसलेली मूर्ती, त्यांची कठड्याला टेकून बसण्याची पद्धत चांगली आठवते. तेव्हापासून आमचे बाबा हे श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त बनले. आम्ही त्यावेळी पुण्याला मेनस्ट्रीटवरील एका बैठया मोठया घरात रहात होतो तेथे आमची दर गुरुवारची बाबांची आरती करण्याची पद्धत सुरू झाली.

इ. स. १९१६ च्या सप्टेंबरमध्ये आम्ही गणपती उत्सव संपल्यानंतर पुणे सोडले व मुंबईला मुगभाट क्रॉसलेनमध्ये भाड्याचे घरात तळमजल्यावर राहू लागलो. त्यावेळी आमचे सर्व कुटुंब म्हणजे आम्ही ८ भाऊ, आई व वडील असे होते. वडीलांना त्या सुमारास त्यांच्या चित्रकाराच्या धंद्यात जबर ठोकर बसली व त्यामुळे ते एकदम हताश झाले. आता श्रीसाईबाबांचे पाय धरल्याशिवाय आपला व आपल्या इतक्या मोठया कुटुंबाचा तरणोपाय नाही असा विचार करून ते आम्हा सर्वांना घेऊन १९१६ च्या नोव्हेंबरमध्ये दिवाळी झाल्यावर श्रीशिर्डीला जावयाला निघाले तेथे आम्ही श्री. दिक्षीतांच्या वाड्यात एका मोठ्या हॉलमध्ये रहात होतो. आमच्या भावंडापैकी मोठे दोघे ( विरसेन व शूरसेन ) हेच काय ते जाणते होते. मी त्यावेळेला

फक्त ७ वर्षांचा होतो पण त्यावेळेच्या बाबांच्या सकाळच्या काकड आरतीपासून ते रात्रीच्या शेजआरतीपर्यंत त्यांचे सर्व कार्यक्रम माझ्या लक्षात राहिले आहेत.

पहिली पहाटेची काकड आरती व्हावयाची, ती एक दिवसाआड मशिदीत व चावडीत होत असे. शेजआरतीच्या दिवशी मशिदीतून सर्व भक्तमंडळी बाबांना घेऊन मिरवणूक काढीत व चावडीमध्ये स्थानापन्न झाल्यावर बाबांचा पोषाख कफनी वगैरे बदलून डोक्यावर मुकुट घालून मग शेजआरती सुरू होई त्यावेळी बाबांच्या मुखावर काय अवर्णनीय तेज दिसत असे ते सांगता येत नाही. मशीद व चावडी यांच्यामध्ये मिरवणूक आली की बाबा चारी दिशेकडे पाहून कोणालातरी आवाहन करीत असत व तोंडाने काही शब्द उच्चारीत असत त्यावेळीही त्यांच्या तोंडावर विलक्षण तेज दिसत असे. मिरवणूकीत सर्व वाद्ये, मृदुंग, टाळ व रणभेरीच्या तालावर भजने म्हणत लोक चालत असत. बाबांच्या मस्तकावर चवऱ्या. मौर्य, पंखे हलविण्यासाठी प्रत्ये-काची अहमहिका लागे. मी लहान होतो तरी मी पण चवरी ढाळण्यासाठी मागून घेत असे. शेजआरती संपली की सर्व भक्तमंडळींना प्रसाद वाटत मग बाबा स्वतः-हून आपली शय्या तयार करीत व मोठी भक्तमंडळी मच्छरदाणी, पडदे पाडीत व चावडीची दारे बंद करीत. काही मोजकी भक्तमंडळी बाबांच्या बाजूलाच आपली पथारी टाकीत.

पहाटे ५ वाजता काकड आरतीची तयारी करून बाबांना जागे करीत व मग काकड आरती संपल्यावर बाबा परत इतर भक्तमंडळीसह मशीदीत येत बाबांची आरती करण्याचा मान बापूसाहेब जोग यांचा होता. ते पहाटे ४ वाजता उठून स्नानसंध्या इत्यादि स्वतःची अन्हीके आटोपून ५/५॥ वाजता काकड आरती करावयास हजर रहात. थंडी कितीही कडक असली तरी त्यांचा हा क्रम कधी ही चुकला नाही. काकड आरती झाल्यावर इतर भक्तमंडळी घरोघरी जात मग बाबा भिक्षेसाठी बाहेर पडत, बरोबर निवडक भक्तमंडळी असत. मी लहान, कसलीच जाणीव नव्हती तरी कधी कधी भिक्षेच्यावेळी बरोबर जात असे व तेथील ग्रामीण लोकांच्याकडून जी काही भाकरी, पोळी मिळे ती झोळीत घेत असे. भिक्षेहून परत मशिदीत आल्यावर बाबा न्याहारी करीत. बडे-बाबा म्हणून एक प्रसिद्ध फकीर दिक्षीतांच्या वाड्यात रहात असत त्यांच्याकडून बाबांच्या न्याहारीला मटण पाठविले जाई. माझा धाकटा भाऊ "रघुनंदन म्हणून" होता. तो बाबांचा फार लाडका होता. त्याला बाबांच्या न्याहारीतून प्रसाद मिळत असे व काही वेळा मला पण त्यांच्याबरोबर तो प्रसाद मिळण्याचे भाग्य लाभले होते. न्याहारी संपल्यावर बाबा भक्त मंडळीसह लेंडी बागेवर जात. त्यावेळी बरेच वाटेत त्यांच्या पाया पडण्यासाठी

वाट बघत रहात. बरोबर झालदार चोपदार असत. त्यावेळचे बाळा चोपदार व नाना चोपदार हे आमच्या चांगल्या ओळखीचे होते व कधी कधी मी त्यांच्याकडून ती वजनदार चोपदाराची काठी, की जी माझ्यापेक्षा १/१॥ फूट उंच होती ती घेऊन बाबांच्या पुढे चालत जात असे. बाबा म्हणजे एक "देव" यापलिकडे मला काही ज्ञान नव्हते पण अजाणता का होईना बाबांच्या पुण्यसहवासाचे मला भाग्य लाभले.

लेंडी बागेवरून आल्यावर बाबांचे मशिदीच्या पुढल्या सपाट टप्प्यावर स्नान सुरू होई. काही भक्तमंडळी स्वतः बाबांच्या मस्तकावर, खांद्यावर गरम पाणी ओतून स्नान घालावयाची. स्नान संपल्यावर बाबा नवीन कफनी वगैरे कपडे घालून त्यांच्या कठड्याच्या जागेवर बसावयाचे. मशिदीसमोरच्या खालच्या पटांगणावर नथूसिंग, किसनसिंग वगैरे गवयाचे गायन सुरू होत असे. साथीला पेटी, सतार तबला वगैरे वाद्ये असत. बाबांची वरीष्ठ श्रेणींतील भक्तमंडळी (उ. काकासाहेब दिक्षींत, बापूसाहेब बुटी, माधवराव देशपांडे, नानासाहेब चांदोरकर, तात्यासाहेब निमोणकर, अण्णासाहेब दाभोळकर, तात्या पाटील) वगैरे मंडळी बाबांच्या आजूबाजूला बसलेली असावयाची. आमचे वडील (शामराव) पण त्या मंडळीत असत. यावेळेला बहुतेक मुंबईचे व इतर बाहेरगावचे लोक सहकुटुंब बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला येत व बरोबर फळफळावळ, नारळ व नैवेद्य वगैरे आणून बाबांना अर्पण करीत, त्यांच्या पाया पडत व बाबा पण त्यांचे क्षेमकुशल विचारून स्वहस्ताने उदी देत. आम्ही लहान मुले खाली पटांगणात गवय्याभोवती बसून सर्व गोष्टी बघत असू. काही वेळा बाबा काही विनोद किंवा कोटी करत व सर्व भक्त मंडळीत मोठा हशा पिकायचा. आम्हा लहान मुलाना ते काय बोलत व हशा का पिकला ते कळत नसे. अशा प्रकारे सकाळचे १०-१०॥ वाजले की आरतीची तयारी सुरू होई. मशिदीत अहोरात्र धूनी असे व ती सतत पेटलेली असावयाची. मशिदीच्या उजव्या भिंतीला एक मोठी घंटा टांगलेली होती. आरतीची वेळ झाली की ती घंटा मोठ्या आवाजाने वाजू लागे व सर्व भक्तमंडळी आरतीला हजर राहण्यासाठी धावत येत असत. आरती साधारण १२ ते १ वाजेपर्यंत चालू असे. बापूसाहेब जोग पितांबर नेसून आरती हातात घेऊन उभे रहात. बाबांचा एक घोडा होता त्याला पण आरतींच्यावेळी हजर करीत व शेवटच्या नमस्काराष्टकाचेवेळी एका ठरावीक ओळीचे वेळी तो घोडा गुडघे टेकून बाबांच्या पाया पडत असे. त्या घोड्याची देखभाल करण्यासाठी एक स्वतंत्र इसम ठेवला होता. आरती झाल्यावर सर्व भक्तमंडळी घरी जायची. आरतीचा प्रसाद म्हणून सर्वांना मुठी मुठी भरून बर्फी वाटली जायची. आता मलप्रश्न पडतो की इतकी मोठ्या प्रमाणात बर्फी कोठून येत असावी. आरती संपल्यावर

बाबांचे काही ठरावीक भक्तमंडळी बोन्याच्या भोवती बसलेली असावयाची व मग पडदा पाडून बाबा सर्वांना असलेले नैवेद्य वाटून टाकावयाचे व स्वतःबरोबर जेवावयाला बसवावयाचे. मी पण माझ्या धाकट्या बंधूबरोबर कधीकधी पडद्यामागे जाऊन बाबांच्या हातचे नैवेद्याचे शिरापूरी वगैरे उत्कृष्ट अन्न सेवन केलेले आहे ते पण मी माझे महद्‌भाग्य समजतो. आम्ही सर्व कुटूंबीय मंडळी १९१६ नोव्हेंबर ते जून १९१७ पर्यंत श्रीशिर्डीला वास्तव्य करून होतो. या आमच्या ८।९ महिन्याच्या वास्तव्यामुळे आम्हा लहान मुलांना पण श्रीसाईबाबांची अजाणतेपणे का होईना पण दृढ भक्ती व श्रद्धा उत्पन्न झाली होती. या श्रद्धेचा परिणाम म्हणून आमच्या घरी दर गुरुवारी रात्री साईबाबांची आरती व भजन सुरू झाले. कोणतीही संकटे किंवा अडचण आली की बाबांची प्रार्थना करणे व त्यांची उदी कपाळाला लावणे हे अंगवळणी पडून गेले आहे.

# ❀ अपूर्व लाभ ❀

—सौ. उषा प्रभाकर अधिकारी
सावित्री भुवन, बंदररोड, रत्नागिरी.

● ७६ वर्षांचे वृद्ध काशिरामपंत रस्त्याने काठी टेकत हळूहळू फूटपाथवरून चालत होते. मुखाने साईनामाचा जप चालू होता पण त्यातच काही विचार मनात येऊन चेहऱ्यावर एक प्रकारची निराशा दिसत होती. चालता चालता चुकून ते फुटपाथवरून कधी खाली आले हे त्यांचे त्यांना कळले नाही. ५।१० पावले चालतायत तोच एक ट्रक भरवेगाने आला व त्यांना धक्का देऊन पुढे गेला. आजूबाजूच्या लोकांचे लक्ष तिकडे गेले. काही तरुण माणसे धावत तिथे आली त्यांनी काशिरामपंताना उचलून फूटपाथवर ठेवले आणि ते त्यांना कितपत लागलेय हे पाहू लागले काशिनाथपंतांच्या डोळ्यातून अखंड अश्रुप्रवाह चालू होता त्यांचे शरीर गद्‌गद हलत होते पण ते तोंडाने म्हणत होते. "साईबाबा साईबाबा!" त्यांचे उद्‌गार ऐकून एक तरुण म्हणाला, 'अहो इथे जवळच साईबाबांचे हॉस्पिटल आहे ना तेथे नेऊया त्यांना त्यांच्या मनातून तिथेच जायचंय असं मला वाटत.' सर्वांना तो विचार पसंत पडला. खरोखरच पलीकडच्या बाजूला साईबाबा धर्मार्थ दवाखाना लॅमिंग्टन रोडला होता. त्या तरुण माणसानी काशिनाथपंताना अलगद उचलले व दवाखान्यात नेले. तेथील डॉक्टरांच्या स्वाधीन करून ते विनयाने म्हणाले, 'डॉक्टर, या आजोबांना

नीट तपासा. त्यांचे राहाण्याचे ठिकाण माहीत नाही. पण आपण उपचार केल्यावर ते आपणाशी बोलतील व त्यांचा पत्ता लागेल. आता ९ वाजले आम्हाला ऑफीसला गेले पाहिजे. " डॉक्टर हसले आणि म्हणाले, काही काळजी करू नका. त्यांची मी योग्य काळजी घेईन. हे हॉस्पिटल कोणाच्या नावाने चालते माहीत आहे ना ? अहो इथे येणाऱ्या आजारी माणसाची घरच्यासारखी काळजी घेतली जाते. या तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा.

मंडळी निघून गेली आणि डॉ. नी काशिरामपंताना तपासले. नाडी थोडी जलद चालत होती पण कुठेही मार लागल्याचे चिन्ह नव्हते नव्हे किरकोळशी जखमही नव्हती. डॉ. नी काशिरामपंतांना गरम कॉफी पाजली. त्यांच्या पाठीवर थोपटत ते म्हणाले, ' आजोबा, मी जरा दवाखान्यात राऊंड मारुन येतो मग स्वस्थपणे तुम्हाला पुन्हा तपाशीन. तुमच्याजवळ बसेन. काही घाबरण्यासारखे नाही. काशिरामपंतांनी मानेनेच संमती दिली. त्यांचे डोळे अजूनही डबडबून येत होते. मनातल्या मनात त्यांचे काही विचार चालू होते.

काही वेळाने डॉक्टर परत आले आता काशिरामपंतांचा चेहरा एका अपूर्व आनंदाने उजळल्यासारखा त्यांना दिसला. त्यांनी पुन्हा काशिरामपंतांना काळजी-पूर्वक तपासले. कुठेही मुका मार वगैरे लागला नव्हता. इतक्या वृद्ध वयात ट्रकने जोराची धडक दिली असता त्यांना कुठेही जरासुद्धा मार बसू नये याचे त्यांना आश्चर्य वाटले. त्यांच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह जाणून काशिरामपंत आपणच बोलू लागले, " डॉक्टर, मला काहीच मार बसला नाही याचे तुम्हाला आश्चर्य वाटले ना अहो सगळे आश्चर्य वाटण्यासारखेच घडले आहे. आज गुरुवार घरात बाबांना झुणका भाकरीचा नैवेद्य असतो म्हणून मिरच्या आणण्यासाठी ही नको नको म्हणत असता बाहेर पडलो. आज किती वर्षे मी बाबांची सेवा करतो पण नावाचाच काशि-राम असे माझ्या मनात आले. बाबांचा महान भक्त काशिराम शिंपी याची आणि माझी मी तुलना करू लागलो. काशिराम बाहेरगावी बाजाराला गेला असताना चोर-ट्यांनी त्याच्यावर हल्ला केला तेव्हा बाबांनी गुप्तरूपाने त्याचे रक्षण केले. त्याच्या-हातून २ चोरांना कंठस्नान घालविले. वर मानाची तलवार मिळवून दिली त्याला झालेल्या जखमा बाबांच्या कृपाप्रसादाने बऱ्या झाल्या. बाबांच्या जिवंतपणी काशि-रामला त्यांचा अखंड सहवास घडला. बाबांची सेवा करायला मिळाली प्रेम चाखा-यला मिळाले. मी अभागी मला कुठे बाबांनी आपला म्हटलय ! उद्या जर मजवर असा प्रसंग आला तर माझ्यासाठी बाबा धावून येतील का असा क्षुद्र विचार मनात

आला. काशिराम शिंप्याचा मला हेवा वाटला याच विचारात मी फूटपाथवरून खाली आलो आणि ट्रकने मला धडक दिली. मी पडतच होतो...लोकांनाही पडलेलाच दिसलो असेन पण काय सांगू डॉक्टर, बाबांनी चक्क आपल्या गुलाबी कोमल हातात अलगद झेलून धरले होते मला ! ते माझ्याकडे इतक्या प्रेमाने पहात होते की मला काय बोलावे हेच सुचेना उलट तेच मला म्हणत होते, काशिराम तूही माझाच आहेस बरे. तुझ्या मनात असा विकल्प का आला ? अरे तुम्ही मला कुठूनही, केव्हाही हाक मारा. मी ताबडतोब तुमच्यापुढे उभा आहे. मला अनन्यभावाने शरण आलेला, मला नेहमी भजणारा मग तो कोणीही असो त्याच्यासाठी मला धावलेच पाहिजे. अरे माझ्या मुला माझे कर्तव्यच आहे ते ! तू माझा अनन्य भक्त आहेस हे माहीत आहे मला म्हणून इतके दिवस मी तुझी एकप्रकारे परीक्षाच घेतली. आता वाईट वाटून घेऊ नकोस. तुला काहीही झालेलं नाही. मी तुझ्या पाठीशी सदैव आहे. तुझे कोट कल्याण होईल. हे पहा रस्त्यावरचे लोक तुझ्याकडे येत आहेत. मी जातो. माझी अशीच नित्य आठवण कर बाबा. अल्ला तुझे भले करील. एवढे बोलून बाबा गुप्त झाले. एवढ्या वेळात मी इतक्या उत्कंठेने त्यांचे मुख न्याहाळत होतो...त्यांचे बोलणे ऐकत होतो पण मला त्यांना नमस्कार करायाचेही भान राहीले नाही. आनंदाने मी इतका वेडापिसा झालो की साईबाबा, साईबाबा एवढेच उद्‌गार माझ्या तोंडून बाहेर पडले. लोकांना वाटले मला या हॉस्पिटलात येण्याची इच्छा आहे म्हणून त्यांनी मला इथे आणले. एका अर्थी बरेच झाले. इथेही त्यांचे मला शुभदर्शन घडले. तुझ्यासारखा मुलगा मला लाभला. माझा मुलगा दूर नागपूरला आहे. तुझ्याच एवढा आहे तो. मी आणि ही दोघंच इथे आमच्या छोट्या घरकुलात असतो. पेन्शन मिळते मुलगाही विचारतो. श्रीसाईबाबांच्या कृपेने खायला प्यायला कमी नाही. पण मन उतावळे. पाहिलेस ना मी किती मत्सरी झालो ते ! डॉक्टर हसले. त्यांच्या डोळ्यात पाणी तरारले होते. काशिरामपंताच्या पाठीवर हात ठेऊन ते म्हणाले, " आजोबा काही वेळा हा मत्सरही उपयुक्त ठरतो म्हणायचा ! त्याच्यामुळेच तुम्हाला बाबांनी आज दर्शन दिले एवढेच नव्हे तर अवखळ पोराला प्रेमभराने मांडीवर घ्यावे तसे तुम्हाला आपल्या मांडीवर घेतले. धन्य आहे तुमची आणि माझे भाग्य थोर म्हणून तुमचे पाय या आमच्या दवाखान्याला लागले. श्रीबाबांनी ज्याला आईने पदराखाली जपावे तसे जपले त्याला मी काय उपचार करणार आणि औषध देणार ? चला मी आपणाला माझ्या गाडीतून घरी पोचवतो. म्हाताऱ्या आजी वाट पहात असतील ना ! त्यांना काळजी लागली असेल. काशिरामपंत टुणकन् उडी मारून उठले आणि म्हणाले होय रे पोरा होय ती खरच माझी काळजी करीत असेल. तीही साईवेडी आहे रे पोरा तिने हे सगळे

ऐकलेन ना की तिला वाटेल की बाबांनी तिलाच प्रत्यक्ष दर्शन दिलेय म्हणून. आदर्श साध्वी पत्नी आहे ती. चल माझ्याबरोबर पण जाताना वाटेत मिरच्या कोथींबीर घ्यायला विसरू नकोस हं नाहीतर आज झुणका झाला नाही तर मला आणि तुला तिथे क्षणभर थांबायला मिळायचं नाही. डॉक्टरांनी मान डोलावली आणि काशिराम पंताना घेऊन प्रसन्न मनाने ते त्यांचे घरी जाण्यास निघाले.

☆ ☆ ☆

# बाबा गेले–आमचा त्राता गेला !

—श्री. श्रीकृष्ण गणपतराव कोठारे
साईमंझिल, १५१ लेडी जमशेटजी रोड,
माहिम. मुंबई १६.

● १९१८ साली बाबांचे निर्वाण झाले. आम्हाला अत्यंत दुःख झाले. आमचा त्राता गेला असे वाटले. आईला साईबाबांच्या निर्वाणाच्या एका वर्षाच्या आत समाधिचे दर्शन घेण्याचा ध्यास लागला होता. साईबाबांच्या समाधिच्या दर्शनासाठी शिर्डीस जाऊ या म्हणून ती माझ्या वडिलांच्या पाठीस लागली होती. ऑफीसच्या कामामुळे वडिलाना रजा मिळणे अशक्य होते तरी आईची उत्कंठा पाहून ते ऑफिसात गेल्यावर त्यांनी दोन चिठ्या टाकल्या. एका चिठीवर होय व दुसरीवर नाही असे लिहिले. पैकी एक चिठी उचलली व उघडून वाचली त्यात नाही असे आले. माझ्या वडिलांचे मन कचरले पण शिरडीस जाण्याच्या आईच्या तगाद्यामुळे त्यांनी चिठीकडे दुर्लक्ष केले व शिरडीस जाण्याचा बेत केला. ऑफिसमध्ये सीक लिव्हचा अर्ज पाठविला ते दिवस पावसाळ्याचे होते. प्रवासात आम्हाला फार त्रास झाला गुरूपौर्णिमा जवळ आली होती. कोपरगावला उतरलो तेव्हा पाऊस पडत होता. त्यावेळी कोपरगावहून बैलगाडीने शिरडीस जाण्याची व्यवस्था होती. परंतु त्यावेळी आम्हाला एकहि बैलगाडी दिसली नाही. पहाटे पाच वाजल्यापासून आम्ही कोणत्याही वाहनाची वाट पहात होतो. साधारण आठ वाजण्याच्या सुमारास आम्हाला एक गृहस्थ भेटले व म्हणाले तुम्हाला शिरडीस जावयाचे आहे ना तर चला मजबरोबर मला कोपरगावला जायचे आहे. इतक्यात तेथे एक बैलगाडी आली व त्यात आम्ही सर्व मंडळी बसून गोदावरी नदीच्या घाटापर्यंत गेलो. वाटेत ते गृहस्थ माझ्या आई-वडिलांबरोबर साईबाबांबद्दल बोलत होते ते आम्ही ऐकत होतो. गोदावरी नदी

ओलांडून जाण्यासाठी नावेची व्यवस्था केलेली असे. नावेत बसण्यासाठी आम्ही सर्व मंडळी बैलगाडीतून उतरलो व नावेत बसलो. बैलगाडीसुद्धा नावेतून परतीरावर गेली. नावेत बसेपर्यंत ते गृहस्थ आमच्या बरोबर होते ते पुढे केव्हा अदृश्य झाले ते आम्हा कोणालाहि कळले नाही. बैलगाडीवाल्याला सुद्धा कळले नाही. आम्हाला कळून चुकले की ही साईबाबांची लीला होती. पुढे शिरडीस पोहोचल्यावर आम्हाला समाधीसमोरील दिक्षीत वाड्यात राहण्यास जागा मिळाली. त्यावेळी शिरडीस हल्ली प्रमाणे वस्ती नव्हती. शिरडीगावची तुरळक मंडळी दिसत होती. त्यावेळी तेथे आजच्यासारखे विजेचे दिवे नव्हते. आम्हाला रात्रीसाठी एक कंदील दिला होता. रात्र पडल्यावर ती एकांत जागा आम्हाला भयाण वाटू लागली. अशा भयाण जागेत रात्री एकटे कसे राहायचे अशी माझ्या आईला काळजी पडली, परंतु साई-बाबांची लीला अगाध होती. रात्री दहाच्या सुमारास दिक्षीत वाड्यात (सध्या भोजन गृह आहे.) बऱ्याच बाया दळावयास आल्या होत्या व त्या जात्यावर बसून गाणी गात होत्या. अशारितीने साईबाबांनी आम्हाला त्या बायांची रात्रभर सोबत दिली. पहाटे २ च्या सुमारास आईला बाह्यविधीस जाण्याची जरूरी भासली म्हणून तिला सोबत देण्यासाठी माझे वडिल तिच्याबरोबर खाली आले तेथे त्यांना वरून उतरण्याच्या जिन्याजवळ एक गाय बसलेली दिसली. आम्ही समजलो की आमचे रक्षण करण्या-करिता बाबांनी गाय बसविली होती. मी जागाच होतो. बाह्यविधी आटोपून आईवडिल वर आल्यावर भिंतीला टांगलेल्या साईबाबांच्या तसबिरीला आईवडिलांनी प्रणाम केला व त्यांच्या लीलेचे कौतुक केले. साईबाबा गेले तरी त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी' ह्या त्यांच्या सुभाषिताची आम्हास वारंवार प्रचिती आली व येत आहे.

१९५३ साली आम्ही नाशिकला राहावयास गेलो होतो. नाशिकहून शिर्डीस जाण्यासाठी एस. टी. बसची व्यवस्था आहे. आम्ही दुपारी १२ वाजता बसने शिरडीस जाण्यास निघालो. संगमनेरला गेल्यावर आमच्या बसच्या यंत्रात बिघाड झाल्यामुळे ती बस शिरडीला जाऊ शकली नाही. संगमनेरला दुसरी बस येण्याची वाट पहात होतो. पाच वाजता नाशिकहून स्पेशल बस आल्यावर आम्ही त्या बसने शिरडीला सायंकाळी ७ वाजता पोहोचलो. साईबाबांचे धूळ दर्शन घेऊन राहण्यास खोली मिळविण्याच्या खटपटीत लागलो. एकही खोली रिकामी नव्हती. आम्हास सांगण्यात आले की आज सकाळपासून एकहि खोली रिकामी झाली नाही. रात्री ८ वाजता एक खोली रिकामी होईल ती आम्हाला मिळेल. असे आश्वासन मिळाले. समाधिमंदिराजवळील चाळीत पहिल्या मजल्यावर खोली रिकामी झाल्यावर

ती आम्हास मिळाली. आमची पहिली बस बिघडली नसती तर आम्ही ४ वाजेपर्यंत शिरडीस पोहोचलो असतो व ५ वाजेपासून ८ वाजेपर्यंत आम्हाला राहण्याच्या जागेची वाट पहात ताटकळत बसावे लागले नसते. बसच्या बिघाडामुळे आमच्या वरची जागेची अडचण श्रीसाईबाबांनी टाळली. संगमनेरला दुसरी बस येईपर्यंत आमचा २-३ तासांचा वेळ कसा गेला हे कळलेच नाही. राहण्याच्या जागेचे संकट टाळावे म्हणूनच साईबाबांनीच ही कृति केली अशी आम्हा सर्वांची खात्री झाली व साईबाबांच्या ह्या लीलेचे आम्हांस आश्चर्य वाटले व आम्ही साईबाबांचे मनपूर्वक आभार मानले. साईबाबांची लीला अगाध आहे हे कबूल केले पाहिजे.

१९५६ साली आम्ही नित्याप्रमाणे शिरडीस जाण्याचे ठरविले नागपूर एक्स्प्रेसमध्ये हमालाच्या सहाय्याने आम्ही बसण्यापुरती जागा मिळविली. काय झाले कोण जाणें इगतपुरी स्टेशन येण्यापूर्वीच आमची गाडी सायडिंगला टाकली व पठाणकोट एक्सप्रेस पुढे काढली. साहजिकच आमच्या गाडीला मनमाडला पोहोचण्यास उशीर झाला. मनमाडला पोहोंचल्यावर आम्हास कळले की मनमाडहून कोपरगावला जाणारी गाडी आमची गाडी येण्यापूर्वीच सुटली होती. शिरडीला जाण्यास दुसरी गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजेपर्यंत नव्हती. आम्हांस प्रश्न पडला आता काय करावे हमालानी सुचविले की शिरडीपर्यंतच प्रवास एस. टी. बसने करा, त्याप्रमाणे आम्ही मनमाड बसस्थानकावर सर्व सामान घेऊन गेलों. तेथे आमच्या गाडीतील शिरडीला जाणारे सारे प्रवासी जागा पटकावण्यासाठी अगोदरच पोहोंचले होते. आमचा क्रमांक एस. टी. स्टँडबाहेर लागला होता. आता बस सर्व्हिस सुरू होईल असे सांगण्यात आले. सकाळी ७ वाजेपर्यंत एकहि बस सुटलीं नाहीं. गर्दी वाढत चालली. प्रत्येकजण जमेल त्या मार्गे आपला नंबर लावीत होता. आमचा नंबर दुपारी १२ वाजता लागला. आमच्या बरोबरीची लहान मुले फार कंटाळली. मी निश्चय केला होता की साईबाबांचे दर्शन घेतल्याशिवाय मी काही खाणार पिणार नाही. सकाळ झाल्यावर दुपारी १२ ची आरती मिळावी म्हणून आम्ही सर्व मंडळी साईबाबांचा धावा करीत होतो. आमची बस दुपारी १ वाजल्यानंतर शिरडीस पोहोंचली. त्यावेळी मुकटा नेसलेले दिगंबर भटजी दिक्षितांच्या वाड्याजवळ कोणाशी बोलत असताना पाहिले तेव्हा मला वाटले की साईबाबांची आरती आटोपून दिगंबर भटजी घरी जात असावेत. मी मनात म्हणालो की साईबाबांनी आमचा धावा ऐकला नाही. दिगंबर भटजीना मी विचारले काय दिगंबर बाबांची आरती झाली कां ? ते म्हणाले, आता आरती सुरू होईल हे ऐकताच मला आनंद झाला व साईबाबांनी आमचा धावा ऐकला. तसाच मी व इत

मंडळी जागेची पर्वा न करता साईबाबांचे धूळदर्शन घेण्यास गेलो. तर सर्व मंडळी साईबाबांच्या आरतीची आतुरतेने वाट वाट पहात होते. बाहेरून दर्शन घेतल्यावर समोरच असलेल्या नळावर तोंड धुवून आरतीला गेलो व आम्हाला सुरुवातीपासून साईबाबांची दुपारची आरती मिळाली. साईबाबांच्या ह्या अगाध लीलेचे आम्ही सर्वांनी कौतुक केले व त्यांच्या चरणी शतशः प्रणाम वाहिले.

दोन वर्षापूर्वी आम्ही शिरडीला मुंबईहून मिनीबसने जाण्याचा बेत केला. सकाळी ५ वाजता आम्ही १०–१२ मंडळी शिरडीस जाण्यास निघालो. वाटेत आमच्या गाडीत बिघाड झाल्यामुळे नासिकला पोहोचण्यास जवळ जवळ १२ वाजले. नाशिकला जेवण घेतल्यानंतर आम्ही आमच्या शिरडीच्या पुढील प्रवासाकरिता निघालो परंतु वाटेतच आमची गाडी चुकून शिरडीच्या रस्त्याला न जाता मनमाडच्या रस्त्याकडे जाऊ लागली हे आम्हास बऱ्याच उशीरा कळले. संध्याकाळचा चार पाचचा सुमार असेल आम्ही सर्व मंडळी बेचैन झालो. रात्री ७ वाजल्यानंतर गाडी जेमतेम कोपरगावपर्यंत आली. तेथे आम्हाला आमच्या गाडीने दगा दिला. चौकशी केल्यानंतर कळले की जवळच पेट्रोल पंप आहे तेथे आम्हास काही साह्य मिळेल... अशा परिस्थितीत आम्ही सर्वांनी ती बिघडलेली मोटर काळोखातून लोटत लोटत पेट्रोल पंपापर्यंत नेली. पण तेथे गाडी दुरुस्त करण्याची काही साधने नव्हती. आम्हास विचार पडला की अशा अपरात्री ह्या निर्जन जागेत एकटे कसे राहावयाचे साईबाबांचा सर्वांनी मनोमन धावा केला. रात्री ९ च्या सुमारास साधारण २५–३० वर्षांचा तरुण जीपमधून तेथे आला. त्यांनी आम्हा सर्वांना तेथे पाहिल्यावर विचारणा केली की येथे का थांबलात ! आम्ही त्याला सर्व वृत्तांत कथन केला. त्यावर तो म्हणाला माझी जीप आहे त्यामधून मी आपणास घेऊन जातो. पण एका फेरीत सर्वांना नेणे शक्य नाही. मी दोन फेऱ्या करीन हे ऐकून आम्हाला हायसे वाटले. त्याने जी रक्कम मागितली ती देण्यास आम्ही तयार झालो कसेही करून शिरडीस पोहचवणे जरूर होते. पहिल्या फेरीत मी व माझे बंधू व लहान मंडळी होती. जीप रात्री १०–३० वाजता शिरडीस साईबाबांच्या समाधी मंदिराजवळ आली तेव्हा आम्हाला कळले की, गाण्याचा कार्यक्रम नुकताच आटोपला आणि शेजारतीची तयारी चालू आहे. साईबाबांची दुपारची आरती आम्हाला मिळाली नाही, आणि धुपारतिही मिळाली नाही तरी निदान शेजारती आम्हाला मिळेल हे पाहून आनंद झाला व इतर मंडळी दुसऱ्या फेरीने तेथे आली व त्यांना सुद्धा शेजारती पहावयास मिळाली. ही साईबाबांची कृपा.

+++

# ❀ हरवलेली बॅग सापडली ❀

— श्री. स. व्यं. कुलकर्णी,
रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर २४६५ वरुण तीर्थवेस,
कोल्हापूर

● श्री. परमहंस सच्चिदानंद योगिराज सद्गुरु श्रीसाईनाथ महाराज यांचा कृपाप्रसाद आमचे कुटुंबावर आहे. तो गेली ३०–३२ वर्षांपासून आहे, त्यावेळी मी कोल्हापूरात संस्थानचे हिशेबी खात्यात नोकरीस होतो. संस्थानचे अकौंटंट जनरल श्री. ए. सुब्रम्हण्यम् हे त्यावेळच्या ब्रिटीश अमदानीतील हिशेबी खात्यातील रिटायर्ड अकौंटस ऑफिसर हे महान साईभक्त होते. त्यांचेकडून साईभक्तीचा धडा व छबीही मिळाली त्यावेळेपासून साईबाबांची उपासना यथामति चालू आहे. अगदी अलीकडेच श्रीबाबांनी दोन-तीन चटका लावणारे अनुभव, चमत्कार दाखविले व प्रकर्षाने मन आकृष्ट करून शिरडीस दर्शनास नेले. शिरडीत "साईलीला" मासिक पाहिले व या घटना "साईलीले"तून प्रसिद्ध होण्यासाठी लिहून पाठवाव्या असे मनात आले. तीच बाबांची आज्ञा समजून घटना जशा घडल्या तशाच कथन करीत आहे.

आमचे घर व कायम वास्तव्य कोल्हापूरला प्रकृतिचे कारणास्तव तात्पुरते वास्तव्य मिरज येथे. शेतीसाठी वरचेवर कोडोलीस जावे लागते. दिनांक २४-७-१९७९ या दिवशी मी व पत्नी मिरजेहून एस. टी. ने कोडोलीस गेलो. माझ्याजवळ ब्रीफकेस होती. येताना कोल्हापूरला एस. टी. ने व तेथून मिरजेस रेल्वेने आलो. कोडोलीतून निघताना ब्रीफकेस सीटचे वरचे सामानाचे कप्प्यात ठेवली होती. ती तिथेच राहिली व त्याची आठवण जयसिंगपुरापुढे गेल्यावर झाली. बॅगेत कागद म्हणजे बॅंकेचे व फॅक्टरीचे पासबुक, ओळखपत्र, साखरेचे कार्ड व गॉगल, चष्मा, पेन इ. साहित्य बॅग हरवल्याची हळहळ माझ्यापेक्षा पत्नीलाच जास्त व तिनेच श्री साईबाबांना नवस केला, की बॅग सापडली की, मनीऑर्डर करीन. मी "श्रीबाबांना एवढेच काम आहे काय ? आपल्या हलगर्जीपणाबद्दल श्रीबाबांना आपण का त्रास द्यावा ! शिवाय त्यात परत न मिळण्यासारखी काही वस्तू नाही." वगैरे सांगून समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तिने आपला हेका सोडला नाही, दुसरे दिवशी मुलाने एस. टी. डेपो ( कोल्हापूर ) मध्ये चौकशी केली. त्यावेळी समजले की, ती गाडी इचलकरंजी डेपोची असल्याने बॅगेचा पत्ता इचलकरंजी डेपोत लागेल. त्यानंतर दुसरे दिवशी म्हणजे २६ तारखेस गुरुवारी इचलकरंजी डेपोत चौकशी करता बॅग

मिळाली व आतील एकही वस्तु हललेली नव्हती व बॅगेतील ओळख कार्डाचे आधारे लगेच परत मिळाली. यात विशेष आश्चर्य म्हणजे आम्ही कोडोलीहून आल्यानंतर त्या गाडीच्या आणखी खेपा झाल्या. त्यातून डेपोत पोहोचून दोन दोन दिवसानी सुखरूपपणे परत आमचे हाती यावी ही श्रीसाईनाथांचीच कृपा. गुरुवारी मुलगा बॅग घेऊन सायंकाळी परत आला तो आम्हा घरच्या सर्व मंडळीना श्रीसाईबाबांचा गुरुवारी प्रसाद आल्यासारखे वाटले. यात महत्व बॅगेचे, आतील सामानाचे अगर त्याच्या किंमतीचे नसून श्रीसाईबाबांच्या सामर्थ्याचे व त्यांचे त्यांच्या भक्तावरील प्रेमाचे. खरोखरीच पत्नीने नवस केला त्यावेळी मला असे वाटले की श्रीबाबा आपल्यासारख्या यःकश्चित भक्ताकरिता धावतील काय व तेही असल्या यःकश्चित कारणासाठी ! पण अशा घटनातून श्रीबाबा कायम आपल्या पाठीशी उभे आहेत असा विश्वास व श्रद्धा निर्माण होऊन मन शांत होते, व ते श्रीबाबांचे चरणी लीन होते.

मागे एकदा सरकारी कामासाठी फिरतीवर असताना अशीच बॅग विसरली. त्यावेळी सरकारी लवाजमा मदतीस असताना देखील बॅग परत मिळविण्यास बराच त्रास पडला व त्यातील काही महत्वाच्या वस्तुही हरवल्या. त्या संदर्भात पाहता या घटनेचे महत्व विशेष जाणवते.

या घटनेने माझी श्रीबाबांच्यावरील श्रद्धा दृढ झाली.

श्रीसद्‌गुरु साईनाथ चरणार्पण मस्तु ॥


# श्री साईलीला

**फेब्रुवारी १९७९ चा अंक श्री साई काव्यबहार विशेषांक**

* कवींनी आपापल्या रचना अजिबात पाठवू नयेत.
* श्री बाबांच्या विषयींच्याच अनेक सुंदर सुंदर काव्यांनी, पदांनी, अभंग-आरत्यांनी नटलेला सजलेला अंक.
* ऐन लेखक-कवी संमेलनात अध्यक्षांचे शुभहस्ते प्रकाशित होत आहे.

# * * * श्री साई अवतार * * *

—श्री. चकोर आजगांवकर एम्. ए.
वाय ११।१७० सरकारी वसाहत,
वांद्रे ( पूर्व ) मुंबई ५१.

" परित्राणाय साधूंना । विनाशायच दुष्कृतां ।
धर्मसंस्थापनार्थाय । संभवामि युगे युगे ।"

● परमेश्वराला मानवी रुपाने केव्हा अवतरावे लागते याची सुंदर संहिताच भगवंताच्या मुखातूनच वरील प्रमाणे प्रगटली आहे. संपूर्ण मानवजातीच्या जीवनात जेव्हा मूल्यांचा संघर्ष निर्माण होतो, मानव समाजपरिवर्तनाचा पर्वकाल प्राप्त होतो, तेव्हा मानवताधर्माच्या सुजनतेच्या संरक्षणासाठी भगवंताला अवताराच्या स्वरूपात भौतिकात जातीने उतरावे लागते. राम, कृष्ण यांसारखे पूर्णावतार जसे पृथ्वीतलावर येऊन समाजाच्या विकासाची दिशा वा क्षितिजे रुंदावतात तसेच संत, सत्पुरुष वा सिद्ध यांच्यासारखे अंशावतारहि अवनीतलावर येऊन भगवंताला अभिप्रेत असलेला धर्ममार्गाचा, संस्कृतीचा, आत्मोद्धाराचा रस्ता झाडून सामान्य जनासाठी स्वच्छ करून ठेवतात. अशाच पंथावरून मानवयात्रा युगे युगे प्रवास करीत आहे.

मला वाटते की शिरडीचे संतश्रेष्ठ श्रीसाईबाबा हेहि एक अवतारी पुरुष होते. ज्या काळात भारतात धर्म भेद, पंथभेद, जातिभेद यांचा बुजबुजाट झाला; मानवतेचे सेवेचे, सात्त्विकतेचे, मूल्य कमी झाले, अशावेळी श्रीसाईबाबांनी आपल्या प्रेम करुणेचा अद्‌भुत स्पर्श भारतीय हृदयांना करून सर्वांना नवजीवन दिले! त्यांनी कधी तत्वज्ञानाचा प्रपंच मांडला नाही. पण कृतीने आणि संपन्न अनुभवांचा लाभ देऊन सर्वधर्म पंथजातीच्या जनतेस भगवद्‌भक्तीच्या रज्जूनी बांधून एकरुप केले. श्रीबाबांची ही एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी केलेली प्रचंड कामगिरी लक्षात घेतली, की त्यांचे अवतारी स्वरुप मनाला पटू लागते व मन तटस्थ, स्तिमित आणि रोमांचित होते! बाबांनी भारतीय समाजाला धार्मिक एकतेची, प्रेम सेवा करुणेची आणि आत्मोन्नतीची शिकवण छोट्या छोट्या कृतीतून, मिताक्षरी वचनातून व दिव्य चमत्कार लीलामधून दिली. किंबहुना भगवंताच्या त्या उत्कट प्रेमकरुणा व चमत्कार शक्तीलाच जगाने 'श्रीसाईबाबा' ही अवतारी संज्ञा दिली.

'श्रीसाईगीतायन'कारांनी आपल्या कल्पशब्दात श्रीसाई अवताराबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत. "**दिगंबराच्या दयाकृपेचे, फकीररूप हे कारुण्याचे त्रिताप वारी निजभक्तांचे, भक्त प्रेम हे शतकामधुनी वाहे अपरंपार** "किंवा" **जे शरयूच्या तटी उमटले, कालिंदीच्या कुशीत रमले, वनवासी प्रासादी भ्रमले दिव्य चरण ते पुनरपि करिती शिरडीतून पुकार!**" भक्तांच्या युगानयुगांच्या ध्यासामुळे साईप्रभूसारख्या महात्म्याला अवतरावे लागते. जणु शतका शतकामधून ही भक्तांची प्रेमकरुणा नवी नवी रूपे घेऊन पृथ्वीतलावर अवतरत असते. श्रीसाईबाबा म्हणजे मूर्तिमंत पूर्णब्रह्म चैतन्य! त्यांना काही स्वतःच्या मुक्तीसाठी धडपडायचे होते, म्हणून मानवी अवतार घ्यायचा नव्हता. तर पूर्वकालात नवनाथांपैकी आदिनाथांनी जे भेदातीत ब्रह्मनिष्ठेचे व भक्तीच्या पुनरुज्जीवनाचे कार्य केले, श्रीशुक मुनीनी जे दिव्य कृष्णचरित हृदयात साठविले होते व परीक्षिताला भागवत रुपाने सांगितले होते, कबीराने जी निर्गुण साक्षात्काराची व रामभक्तीची महती आपल्या मिताक्षरी दोह्यात वर्णिली होती, तिला पुन्हा कुळीत आणून प्रसारित करण्यासाठी गोदावरी नदीच्या काठी मानवी देहाने जन्मावे लागले. जणु जटाजूट कमंडलू धारण करणारे श्रीदत्तप्रभु कृष्णातट सोडून डोक्याला फडके बांधून हातात तरफ लोहपात्र घेऊन गोदावरीच्या तीरावर आपल्या लीला एकोणीसाव्या शतकाच्या मध्यावर पुन्हा दाखवू लागले होते. शिरडीचा परिसर श्रीसाई अवताराने मोठ्या मार्मिकपणाने आपल्या अवतारकार्याला निवडला होता. गोदेच्या काठचा भाग हा भागवतधर्माच्या स्पर्शाने जणु पावन झाला होता. नाथसत्पुरुषांच्या समाध्या, श्रीरामचंद्राचे वास्तव्य, भागवत संताच्या सत्संग यांचा लाभ या भागाला झाला होता. त्यामुळे याच ठिकाणी बाबांनी आपली कर्मभूमी निवडली. याच भागात पुराणकाली समुद्रमंथनाचे कार्य देव दानवांनी केले होते. येथेच पूर्वी क्षीरसागर होता. कृष्णाची सागरात बुडलेली (द्वारकामाई) द्वारावती याच भागात होती, असे इतिहासाचे जाणते म्हणत असत.

बाबांची कर्मभूमी जरी शिरडी होती, तरीही त्यांचा जन्म पाथरी परभणी भागात झाला होता. बाबांचे गुरु गोपाळस्वामी देसाई (व्यंकुशहा) हे तीर्थ यात्रेला निघाले व वाटेत अहमदाबादेच्या सुबागशहा सत्पुरुषाच्या दर्ग्याजवळ गेले, तेव्हा त्या दर्ग्याला घाम फुटला व त्यातून शब्द फुटले की "**हे रामानंदा तुला मी जाणले आहे. तू सध्या शेलूगामी भक्त कैवाराचे कार्य करीत आहेस. तुला तीर्थयात्रा करण्याची जरुरी नाही. तुझा शिष्योत्तम कबीर हा लवकरच मानवत जवळ अवतरणार आहे. तू त्याच्या आगमनाची वाट पहा. तो तुझ्या घरी यदृच्छेने येऊन पोहोंचणार आहे.** श्रीगोपाळस्वामी

हे तिरुपतीच्या व्यंकटेशाचे भक्त व शेलूचे तहसिलदार होते. ते महान् भक्त असून पूर्ण साक्षात्कारी पुरुष होते. कबीराला त्याच्या जीवनात राममंत्राची दीक्षा देणारे हेच पूर्वजन्मीचे रामानंद. श्रीसाईबाबा एका भगवद्‌भक्त हिंदु दांपत्याच्या पोटी जन्मास आले. जन्मतःच त्यांना मातापितरांनी एका वृक्षाखाली ठेवून वानप्रस्थाश्रम स्वीकारला. एक फकीर जोडप्याने त्यांचा सांभाळ केला. त्यामुळे पूर्व जन्मीच्या कबीराचे हिंदु मुस्लिम ऐक्य व अल्ला राम रहिम यांची एकता शिकविणारे अवज्ञान ते पुनश्च कृतीने जगले. दोन्ही धर्मातील उत्तमोत्तम संस्कार त्यांना बालवयातच समजले. हा मुलगा जन्मतःच ज्ञानी व जगावेगळा होता. तो मशिदीत शिवलिंग घेऊन त्याची पूजा करी तर देवळात कुराणातील कलमे पढत असे. फकीर जोडप्यापैकी फकीर पित्याने लवकरच देह यात्रा आटोपली व मरणापूर्वी आपल्या पत्नीस शेलू गावचा अनाथांचा स्वामी व्यंकुशहा (व्यंकटेश भक्त गोपाळस्वामी) तुमचा सांभाळ करील अशी सूचना केली. फकीर पत्नी आपल्या बालकाला घेऊन गोपाळस्वामींच्या आश्रयास आली. **"हा तर साक्षात् शिव आला"** म्हणून श्रीबाबांचे गोपाळ-स्वामींनी स्वागत केले व मातापुत्रास आपल्याकडे ठेवून घेतले. गोपाळस्वामींच्या शिष्यात श्रीबाबांनी आपल्या पूर्वतपाने तात्काळ प्रगती करुन घेतली व ते गुरुंचे अत्यंत प्रिय झाले. त्यांचे गुरुबंधू या फकीरबालकाचा मत्सर करू लागले एकदा बाबा गुरु-साठी बेलपत्री आणण्यासाठी वनात गेले असता एका मत्सरी सहाध्यायाने त्यांच्यावर वीट फेकून त्यांना जखमी केले. हे वृत्त गोपाळस्वामीना कळताच ते फार व्यथित झाले. त्यांनी आपल्या धोतराच्या फडक्याने बाबांच्या शिराची जखम बांधली व त्यांना म्हटले की आता तू येथून पूर्वेला जा. तुला येथे माझ्यामुळे फार त्रास होत आहे. मीही माझे अवतार कार्य लवकरच संपवणार आहे. त्यांनी रस्त्या-वरून जाणाऱ्या एका लमाणातील वांझ गाईचे तीन शेर दूध काढून बाबांना पाजले व त्यांना म्हटले मी यातून तुला ज्ञान, भक्ति व कर्म दिले आहे. आता मजपाशी काही उरले नाही. ती वीट प्रसाद म्हणून गोपाळस्वामींनी बाबांना दिली. ती शेवटपर्यंत त्यांची सोबतीण होती. शेलूवरून बाबा पूर्वेस नागपूरकडे गेले. तेथे ताजुद्दिन बाबांची व त्यांची गाठ पडली. या नवनाथापैकी एक असलेल्या त्या महान सिद्धाने म्हणजे ताजुद्दीन बाबांनी साईबाबाना नाथपंथी दीक्षा देऊन धन्य केले. बाबांचा फकीर तो हाच. याच फकीराने त्यांना औरंगाबाद मार्गे शिरडीस जाण्यास सांगितले. चांद-पाटलाच्या घोड्याच्या शोधाच्या व त्याच्या मुलीच्या शिरडीतील सोयरिकेच्या निमि-त्ताने बाबा शिरडीस आले, ते तेथे कायमचे राहिले.

खंडोबाच्या मंदिराच्या द्वारात त्यांना तेथील पुजारी म्हाळसापतीने अडवून मुसलमान म्हणून मंदिरप्रवेश नाकारला, तेव्हा बाबांनी त्याला दिव्य उपदेश केला.

**"अरे भगता, देव मंदिरातहि नाही की मशिदीतहि नाही. तो हिंदूही नाही की मुस्लिमहि नाही. तो जातभेदधर्मातीत आहे. तो माणसाच्या अंतरंगात रहातो. भक्तांच्या विदेही पणात, योग्यांच्या समाधीत, ज्ञात्याच्या आनंदात प्रभूचे वास्तव्य असते. देवाला प्रेम हवे, बाह्य उपाधी नको" हीच ज्ञानाची प्रभात बाबांनी शिरडीत फुलवली.** साई-गीतायनकार म्हणतात. **"कुणी राम म्हणावे अथवा रहिम म्हणावे, परि अभेदरुपे नित त्याने विलसावे" "त्या धर्म नसे, नच पंथ, जात अज्ञात का चैतन्याला चैतन्याविण जात?"** ही धर्म पंथातीत करुणा घेऊन हा अव-तारी पुरुष शिरडीतील पडक्या मशिदीकडे वळला, तो शेवटपर्यंत तेथेच राहिला. या मशिदीला त्यांनी "द्वारावती, द्वारका" मानले.

बाबांच्या शिरडीतील वास्तव्यात श्री. कोते पाटील यांची पुण्यचरित स्त्री सौ. बायजाबाई यांनी त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम केले, त्यांना भाकरतुकडा भरवला या मातो-श्रीच्या मरणाच्यावेळी बाबा "माझ्या कोत्याची माय गेली," या विव्हल शब्दात ओक्साबोक्सी रडले. या मातृप्रेमासाठी त्यांनी तिच्या पुत्राचे मरण स्वतःवर घेऊन विजयादशमीस देहाचे सीमोल्लंघनहि केले. गंगागीर बाबा या सत्पुरुषाने बाबांचे अवतारी स्वरुप पूर्णपणे ओळखल्यामुळे गिरीसंप्रदायाचा नामसप्ताह त्यांनी शिरडीत नाकारण्याचे नाकारले. ते म्हणाले **"शिरडीत हा अवतारी महात्मा या भूमीचे तीर्थक्षेत्रात रुपांतर करील. येथील धूळ कपाळाला लावून विश्वातील भक्त भाविक मंडळी स्वतःला पावन करून घेतील. येथे नामसप्ताह कशाला?"**

श्रीबाबा भक्तांना जी उदी देत ती देहाची क्षणभंगुरता व आत्म्याचे अमरत्व पटविण्यासाठी! या उदीने भक्तांच्या व्याधी, संकटे दूर पळत व त्यांच्या मनात श्रद्धा व आत्मविश्वास बाणत असे. श्रीबाबांची कीर्ती त्यांनी केलेल्या पाण्याने पणत्या पेट-विण्याच्या व मशिदीत चिंध्यानी आढ्याला बांधलेल्या फळीवर योगनिद्रा करण्याच्या अत्युद्‌भुत चमत्कारामुळे सर्वत्र पसरली. सामान्यजनांना हा कुणी वेडा फकीर नसून फार थोर योग्यतेचा महात्मा आहे हे या चमत्कारामुळेच समजले. चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणतात ना? बाबा शिरडीत घरोघर भिक्षा मागून उदर निर्वाह करीत. सर्वसिद्धी पायाशी लोळण घेत असताहि बाबा केवढे महान् वैराग्य प्रकट करीत बरे! बाबा स्वतःकडे आपल्या दिव्य चमत्कारांचे कर्तृत्व मुळीच घेत नसत. ते मशिदीतल्या त्या फकीर अवधूताला सर्व श्रेय देत. हा फकीर म्हणजे श्रीदत्तांची सिद्धशक्ति अथवा श्रीसद्‌गुरु ताजुद्दीनांची कृपा मूर्तीच होय. श्रीसाईबाबांनी आपल्या जीवनात अनेकांच्या दुःखाना दूर केले, दुर्धर व्याधी हरण केल्या, प्रचीति व

चमत्कारांचे आमीष दाखवून बुडत्या जनाना साधनामार्गावर आरूढ केले. श्रीबाबांनी माधवरावांसारखे सख्यभक्तीचे उपासक, चांदोरकर–दासगणूसारखे ज्ञानी भक्त निर्माण केले. श्रद्धा आणि सबुरीचे, सेवा आणि त्यागाचे, भक्ती आणि शरणांगतीचे तत्त्वज्ञान मिताक्षरी शब्दात व प्रतीकात्म कृतीने जगाला पटविले. आपले शिवगुरु स्वरूप किंवा विष्णुदत्त स्वरूप त्यांनी अंतरंग भक्तांसमोर प्रगट केले. वैर, ऋण व हत्या यांना टाळण्याचे व नेकीने वागण्याचे महाव्रत त्यांनी भाविकांना शिकविले. बाबांचे जीवन विरोधाभासानी भरलेले होते. मशिदीत घंटा व अग्निवेदी त्यांनी उभारली. एका जागी बसून ते विश्वाला स्पर्श करीत. रुद्रावतार धारण करून संयमाचे धडे देत दक्षिणा मागत, पण कवडीहि जवळ ठेवीत नसत. त्यांना भेदभाव माहित नव्हता. कावळे कुत्रेहि त्यांच्या ताटात जेवत. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत. प्रवचने झोडली नाहीत. पण त्यांचा प्रत्येक शब्द वेदांत होता. ईश्वराचे निःश्वासित होता! **भारताच्या धर्म, पंथाच्या भिंती पाडून तसेच जगाचे भौगोलिक अंतर तोडून त्यांनी मानवतेला प्रेम करुणेच्या भक्तीच्या वर्तुळात आणले व मानवी जीवनाला कृपेचा अगदी सरळ सरळ स्पर्श केला.**

**हा अवतारी पुरुष सांगे की "प्रेमानुसंधानाने मी भक्ताना लाभतो तुम्ही मंत्र तंत्र योगायोग, जपतप यापैकी कुठलाहि मार्ग आचरा अगर आचरू नका. सर्वसाधनांच्या सफळतेसाठी तुम्हाला शेवटी मजकडेच यावे लागेल. भक्ति, ज्ञान, कर्म, योग जेथे थिटा पडेल, तेथे माझी कृपाच तुम्हाला उन्मनीचे लावण्य दर्शवील. तुम्ही माझ्याकडे पहा. मी तुमच्याकडे पाहीन. तुमचा भार माझ्या शिरावर ठेवा. तुम्ही अनन्यशरण समर्पण व्हा. मी तुम्हाला पैलपार नेईन. "अहं त्वा मोक्षयिष्यामि"**

बाबांनी विजयादशमीस देह ठेवला. पण ते अमर आहेत. अतिपिपासित, दुःखी, दीन मानवांसाठी त्यांच्या कृपा करूणेचा हात अजूनहि काळाचा आणि दिशांचा पडदा भेदून पुढे येतो. शिरावरुन फिरतो. त्यांच्या डोळ्यातील प्रेमाश्रू अजूनहि भक्तांच्या गालावर ओघळतात. हा अखंड अवतार आहे, त्याला ना आदी, ना अंत! **जेथे दुःख आहे, व्यथा आहे, आर्तता आहे, तेथे बाबांचे डोळे लागलेले आहेत. त्यांचे उष्ण निःश्वास आपल्याला अद्याप जाणीव करून देतात की, "मी मानवतेचा धर्मातीत प्रेमाचा अवतार आहे."** श्रीबाबा हे प्रेमकरूणेचे मूर्तीमंत रुपडे आहे. हे श्रीदत्तांच्या कृपेचे अवतरण आहे. हा श्रीसाई अवतार सर्वस्पर्शी सर्वदर्शी, सर्वशक्तिमान आहे. **श्रीसाईनाथो विजयते.**

☆ ☆ ☆

# ★ श्री बाबांच्या भेटीचा आनंद ★

—श्री. ग. ज. चितांबर
अहमदनगर,

● मनःस्थिती द्विधा आहे. एक मन सांगते देव भेटल्याचा अनुभव दुसऱ्या कुणासही सांगू नये. कारण एक तर तसा विश्वास नसणारांना हे ढोंग व भोंदूपणा वाटेल, आणि काहीना स्वप्रतिष्ठा वाढविण्याचा तो लेखकाचा एक प्रयत्न वाटेल. शिवाय मला माझ्या आईची शिकवण पुन्हा पुन्हा आठवते, की अशा प्रसंगांच्या वर्णनांनीं व इतराना सांगण्याने आपले पुण्य कमी होते. ह्या सर्व विचारांचे मनावर दडपण असूनही विचार पटणारे असूनही साईभक्तांच्या प्रेमळ आग्रहाच्या इच्छापुढे मला हात टेकणे ( जोडणे ) भाग पडले व हातात टाक घ्यावा लागला. अशा अनुभव वाचनाने अनेक साई भक्तांना मानसिक समाधान मिळते; असा अनुभव येतो. ते त्यांना मिळत असेल तर तेवढीच साईभक्तांची व त्यांचेमार्फत साईबाबांची सेवा. ही सेवा घडवून आणण्याचे सर्वश्रेय मा. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांना जाते. त्यांनी प्रेमपूर्वक केलेल्या आग्रहातूनच हे लिहित आहे असो.

## दुसऱ्यांचे भले करावे :

लहानपणी मनावर झालेले संस्कार कधीच पुसत नाहीत म्हणतात. माझे लहानपण बाबांच्या सहवासात गेल्यामुळे माझे मन नेहमी बाबांच्या कृपेने भारावलेले असते. आपण सद्विचारांनी प्रेरित होऊन दुसऱ्याचे कधीहि वाईट न चिंतिता जीवनमार्ग आक्रमिला की जगाबरोबर आपलेही चांगले होते ही माझ्या आईने मला दिलेली शिकवण तिला बाबांकडूनच मिळाली.

" देगा इसका ही भला
न देगा इसका ही भला । "

बाबा समाधिस्थ झाल्यावरही शिर्डीत एक फकीर भिक्षा मागताना म्हणत असे, "देगा इसकाहि भला; न देगा इस काहि भला." हे जीवनतत्त्व रोज वारंवार कानावर पडले; ते शिर्डीत. ही प्रेरणा माझे बाबतीत. जीवन विषयक व जीवनदायी प्रेरणा ठरली.

## धाव पाव माझे आई

मी रोज जागा झालो की जे नामस्मरण करतो त्यात गणपति, गुरु व साईबाबा ह्यांचे श्लोक आहेत त्यात.

शिर्डी माझे पंढरपूर, साईबाबा रमावर, शुद्ध भक्ति चंद्रभागा, भाव पुंडलीक जागा, याहो याहो अवघे जन, करू बाबांसी वंदन, गणू म्हणे बाबा साई, धाव पाव माझे आई ॥ ह्या गीताचाही अंतर्भाव आहे.

शुद्ध अंतःकरणाने केलेल्या ह्या प्रार्थनेप्रमाणे साईबाबा धावत येतात; पावतात व दर्शनही देतात.

लहान बालकांना आई, वडील, आजोबा, आजी, पाहण्याने जो निरागस निर्मल व निर्भेळ आनंद मिळतो तो आपले (भक्तांचे) मन तितकेच निर्मळ असेल तर आपल्या मनावील देवाची म्हणजेच साईबाबांची मूर्ति पाहून मिळतो. मात्र मनाची उंची तितकी हवी व अवस्था तशी हवी.

## दुसऱ्याचे घर आधी बांधा

अनेकांची घरे बांधून व्हावीत व त्यात अगदी गरिबांचीहि व्हावीत; असा जो प्रयत्न माझे हातून झाला त्यात माझ्याच मालकीच्या प्लॉटवर एका हताश व्यक्तीस, त्याचे सामान घराचे बाहेर काढण्याची वेळ त्याच्या घरमालकाने आणल्यामुळे आमच्या सोसायटीत प्लॉट नसलेल्या ह्या व्यक्तीस मी माझ्या प्लॉटवर निम्म्या भागात घर बांधण्याची परवानगी देण्यास संमति दिली.

निम्म्या भागात घर बांधून झाल्यावर ह्या गृहस्थाने रिकाम्या भागात झाडे लावली. काही वर्षांनी मी घर बांधण्यासाठी माझ्या प्लॉटवर गेलो तेव्हा ' हा संपूर्ण प्लॉट माझाच आहे. येथे तुम्हाला बांधकाम करता येणार नाही ' अशी भूमिका ह्या सद्‌गृहस्थांनी घेतली. त्यावेळचे सोसायटीचे पदाधिकारी मला म्हणाले ' तुम्ही फक्त येथे उपस्थित रहा. रेषा आखून आम्ही तुमच्या जागेत घर बांधून देतो ' तथापि माझी भूमिका अशी ' जी व्यक्ति सद्‌हेतु, सदिच्छा व उपकृति विसरते व आपल्या संकट काळी उपयोगी पडलेल्या माणसाशी इतक्या कृतघ्नपणे वागते त्या व्यक्तीच्या शेजारी कायमचे घर बांधून राहणे बरे नाही. हा माणूस आपल्याशीच असा वागतो तर ह्याच्या घरातील मुले बाळे आपल्या मुला बाळांशी कसे वागतील ? बरे शेजाऱ्याशी भांडण झाले तर भाड्याची जागा सोडता येते. भरपूर खर्च करुन मालकीचे घर बांधायचे अन् जन्मभर भांडत बसायचे हे काही चांगले नाही. '

ह्या विचारांनी मी त्या पदाधिकाऱ्यांना व माझ्या पेक्षा १५-२० वर्षांनी अधीक वयस्क असणाऱ्या व्यक्तींना नकार दिला. ' माणूस असा असतो. ' ह्याचा अनुभव गाठी बांधून स्वस्थ बसलो. विशेष असे की ह्या गृहनिर्माण सोसायटीचा मी पहिली बारा वर्षे बिनावेतन चिटणीस होतो. असाही एक अनुभव ' परमेश्वरा ह्याही माणसाचे

भले कर' आणि ह्याच विचाराने ह्या गृहस्थाच्या मुलीस कन्या विद्यामंदिरात मी शिक्षिकेची नोकरी दिली.

## साईबाबांची कृपाः

सदिच्छा पेरल्या तर चांगले फळ मिळते. काही वर्षांनी ह्याच सोसायटीतील एका सभासदाने त्यांची नगरात दोन घरे बांधून झाल्यावर त्यांच्या ह्या सोसायटीतल्या प्लॉटवरचा हक्क माझ्यासाठी सोडला व तसे त्यांनी लेखी कळवले. ह्या माणसातील सद्हेतु बळावले. त्यांच्या रूपाने परमेश्वर उभा राहिला.

यथाकाल माझे घर झाले आणि एका पहाटे अति निवांत वेळी साईबाबांनी माझ्या ह्या घरी येऊन अति आनंदाने मला भेट दिली. त्यांचे येणे, बसणे, उठणे, बोलणे, भेटणे व जाणे केवळ मित्रासारखे, अगदी समानतेचे होते. मी क्षणभर अवाक झालो. ते मला म्हणाले, "मला यापूर्वीच घर पहायला यायला हवे होते." माझा आनंद गगनात मावेना.

## पूर्व स्मृतीस उजाळा :

मी संभ्रमित झालो. तरीहि क्षणार्धात माझ्या पूर्वस्मृति जागृत झाल्या आणि माझ्या लहानपणी माझ्या आईने मला चापट मारली तेव्हा "ह्याला पुन्हा मारू नकोस. हा माझा पूर्व जन्मीचा मित्र आहे." हे आईला सांगितलेले बाबांचे शब्द मला आठवले. माझ्या हॉलमधून उठून बाबांना दुध देण्यासाठी आणावे व पत्नीला सांगावे म्हणून मी उठलो मात्र आणि बाबा अदृश्य झाले.

बाबा अदृश्य झाल्यानंतर मात्र मी विषण्ण झालो. ती विषण्णता मी क्षणार्धात झटकली. एकाच विचाराने "माझ्यासारख्या अनेक भक्तांना किंवा मित्रांना भेटायला बाबांना जायचं असेल. आपल्या एकट्याच्याच वाट्याला ते कितीवेळ देतील!"

दृश्य नसले तरी अदृश्य स्वरुपात त्यांच्या भेटीचा आनंद मी नेहमीच उपभोगतो. विशेष संकटकाली त्यांच्या केवळ आठवणीने मला धैर्य येते.

## कै. नानूभैय्या आले

ह्या प्रसंगानंतर पूर्व सूचना न देता, शिर्डीहून परतताना एके दिवशी कै. नाना सो. अवस्थी श्री. पुजारी ह्यांना घेऊन माझे घरी आले. [ मी नानासाहेबांना नानूभैय्या म्हणत असे. त्यांच्याच घरात पुण्यात राहिलो, शिकलो इतिहास मोठा आहे. स्थलाभावी न देणे बरे.]

आदल्याच दिवशी मी पत्नीसह पुण्यास गेलो होतो. माझ्या मुलाने (चि. सुरेशने) मला फोन केला. आम्ही सर्व कामे सोडून तातडीने नगरला आलो. किती आनंदाचा दिवस तो. कै. नानू भैय्या व त्यांचे वडील कै. दाजीसाहेब हेही किती परम साईभक्त. त्यांच्याच कृपेने आमचे शिक्षण झाले. कै. नानू भैय्यांनी त्या रात्रीही मुक्काम केला. साधू संत येती घरा तोची दिवाळी दसरा, हे वचन प्रत्यक्षात अनुभवलं, घरात आनंदी आनंद झाला. नानू भैय्यांचा आनंदही शब्दातीत होता. त्यांचे पाय मी व माझ्या सहकाऱ्यांनी काढलेल्या कन्याविद्या मंदिराच्या इमारतीस लागले हे केवढे मोठे भाग्य. ज्यांच्या घरी राहिल्यामुळे आपले काही शिक्षण झाले, त्यापेक्षा ज्यांचेकडून संस्काराचे बाळकडू मिळाले त्यांनी स्वच्छेने आपल्या घरी व संस्थेत येऊन आशिर्वाद द्यावेत व आनंद व्यक्त करावा. ह्या परते भाग्य ते कोणते ? त्या दिवसांच्या नुसत्या आठवणीनीही आम्हा सर्वांचे दिवस आनंदात जातात.

अशा आनंद सर्व साईभक्तांना मिळो ही साईचरणी प्रार्थना.


## श्री साईलीला

**सहाव्या लेखक-कवी संमेलनातील परिसंवादाचे विषय —**

१) श्री साईबाबा आणि त्यांची शिकवण

२) श्री साईबाबा आजच्या युगात असते तर !

**शिवाय —** श्री साईबाबांसंबंधी हवे ते विचारा
ह्रा सामान्य ज्ञानात्मक रंजक कार्यक्रम.

# बाबांनी कुलूप उघडले

श्री. डी. आर. खडके
१४ सहवास बिल्डिंग,
आर. सी मार्ग, चेंबूर मुं. ७१.

● १९५३ सालची गोष्ट. मी माझ्या मातोश्री व कु. ताराबाई चव्हाण (सध्याच्या सौ. ताराबाई चेंदवणकर व साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या पत्नी) असे बॉंबे सेंट्रल जवळील माझ्या निवासस्थानाहून टॅक्सीने बोरीबंदरला जाण्यास निघालो होतो. रात्री ८॥ चा सुमार होता, व नऊ वाजता बोरीबंदरला वाराणसी एक्स्प्रेस पकडून आम्हाला शिर्डीला जायचे होते.

त्या काळात आताप्रमाणे मुंबई ते शिर्डी थेट एस. टी बसेस नव्हत्या. मुंबईचे बहुतांश साईभक्त मुंबईहून मनमाडला जायचे. तेथे गाडी बदलून मनमाडहून सुटून औरंगाबादकडे जाणाऱ्या गाडीत बसायचे व वाटेत कोपरगावला उतरून तेथून कोपरगाव ते शिर्डी एस. टी. ने अगर टांग्याने जायचे.

माझ्या मातोश्री श्रीमती जानकीबाई खडके यांचे वय त्यावेळी सुमारे ७५ च्या आसपास होते. श्रीसाईबाबा हयात होते त्यावेळी माझ्या मातोश्री व माझ्या लहानपणी वारलेले, माझे वडील अनेकवेळा शिर्डीला जाऊन श्रीसाईबाबांच्या सान्निध्यात महिना दोन महिने राहत असत. मातोश्रींची श्रीबाबांच्यावर निस्सिम भक्ती होती आणि त्याच भक्तीच्या पोटी मी त्यांना दरवर्षी, त्या खूप थकल्या असतानाही वर्षातून एकदा चारपाच दिवसाच्या मुक्कामाला शिर्डीला घेऊन जात असे. त्या जुन्या वळणातल्या असल्याने शिर्डीच्या मुक्कामात बाहेरचे कुठलेही काही चहा जेवण घेत नसत.

मुंबईहून निघताना तूप, मीठ मसाल्यासकट सर्व काही एका पेटीत बांधून बरोबर घेत. स्टोव्ह, घागर, ताटे वगैरे सरंजाम बरोबर असे. दर वर्षी डिसेंबरमध्ये जाण्याचा कार्यक्रम ठरला म्हणजे अगोदर दहा बारा दिवस त्यांची समानाची जुळवा-जुळव सुरु होई. मी तर त्यांना विनोदाने म्हणत असे की आता लंडनला जाण्याची तयारी सुरू झाली.

वर लिहिल्याप्रमाणे बॉम्बे सेंट्रलजवळील माझ्या निवासस्थानाजवळून आम्ही टॅक्सीने बोरीबंदरला निघालो होतो. टॅक्सी वेगाने रस्ता कापत होती. आम्ही पुढील प्रवासाची सुखचित्रे मनात रंगवत होतो, आणि गप्पा चालू होत्या. टॅक्सी धोबीतलाव-पर्यंत येऊन पोहोचली आणि इतक्यात माझ्या मातोश्रीला एकदम आठवण झाली

की त्यांच्या सर्व साहित्य ठेवलेल्या पत्र्याच्या बॅगेची किल्ली घरीच टेबलावर विसरली. त्यांनी मला घरी परत टॅक्सी घेण्यास सांगितले. मी सांगितले ते शक्य नाही. कारण बोरीबंदरपासून आम्ही फक्त आता तीन चार मिनिटाच्या रस्त्यावर होतो व बोरीबंदरहून गाडी सुटण्यास फक्त पंधरावीस मिनिटांचा अवधी होता. टॅक्सीने परत घरी जाऊन किल्ल्या घेऊन परत बोरीबंदरला गाडी पकडणे सर्वथैव अशक्य होते. टॅक्सी बोरीबंदरच्या दिशेने पुढे मार्गक्रमण करू लागली आणि मातोश्री अतिशय अस्वस्थ झाल्या आम्ही टॅक्सीने बोरीबंदरला पोहोचलो आणि तिथून आमचा पुढील प्रवास सुरू झाला. पण माझ्या मातोश्रींचे मन सारखे मागे जेवणाच्या टेबलावरील किल्ल्या-कडे धाव घेत होते सबंध प्रवासात त्यांच्या बोलण्याचा विषय एकच होता आणि तो म्हणजे त्यांच्या पेटीला लावलेले कुलूप व त्या कुलूपाच्या घरच्या टेबलावर विसर-लेल्या किल्ल्या.

मी व ताराबाई निरनिराळ्या विषयावर बोलून मातोश्रींना कुलूप किल्लीचा विसर पाडण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु त्यांचे मन त्या कुलूपातच जणू बंद झाले होते. त्यामुळे हरदासाची कथा मूळपदावर ह्या म्हणीप्रमाणे मातोश्रींची कथा पुनः-पुन्हा कुलूपकिल्लीच्या मूळपदावर येत होती पृथ्वी गोल आहे याचा मला आणि तारा-बाईना वारंवार प्रत्यय येत होता. कारण दुसऱ्या कुठल्याहि विषयावर आम्ही फिरू लागलो तरी मातोश्री आम्हाला त्या कुलूपावर पुन्हा आणून सोडत होत्या. माझ्या मते त्या कुलूपाचे तसे काही महत्त्व नव्हते. शिरडीला पोचल्यावर आजूबाजूच्या लोकांच्या किल्ल्यांपैकी एखादी चावी लागते का पहायचे व न लागल्यास कुलूप तोडून टाकायचे असे मी म्हणालो पण...छे, छे, भलतेच...ते कुलूप तर मातोश्रींच्या सासऱ्यांच्या वेळचे होते...जुन्या काळचे भरभक्कम...तसले कुलूप आता पहायला पण मिळणार नाही...अनुसूया मोलकरणीशी बोलण्याच्या नादात किल्ली टेबलावर विसरली...भलत्याच वेळी अनुसूया बोलायला मधे आली...आताची कुलूपं म्हणजे नुसती तकलादू...वगैरे अनेक प्रकारे मातोश्री मला कुलूप-महात्म्य सुनवत होत्या. शिरडीला पोहोचल्यावर कुलूप तोडण्याची पाळी आली तर मातोश्री काय पवित्रा घेतील याचा अंदाज करणे कठीण होऊन बसले. हो, कदाचित म्हणायच्या कुलूप तोडण्यापेक्षा बाबांचे दर्शन घेऊन लगेच मिळेल त्या गाडीने मुंबईस जाऊ या.

अशा थाटात आमचा प्रवास चालू होता. बोरीबंदरहून सुटल्यावर मनमाडला रात्री एक वाजता पोचलो. हमालाकडून सर्व सामान उतरवले. रेल्वेचा जिना चढून व उतरून दुसऱ्या फलाटावरून आलो तेथे औरंगाबादला जाणारी गाडी दरवर्षी प्रमाणे अंधारात उभी होती. तिला चार वाजता प्रवासास निघायचे होते. त्यामुळे जणू काही ती निद्रावस्थेत होती. अंधारात चाचपत जागा शोधण्याची आम्हाला दर वर्षी सवयच

झाली होती. पहाटे चारला ती गाडी सुटून साडेपाचला कोपरगावला पोहोचली. तेव्हा मी ताराबाईंना पुढे स्टेशनच्या बाहेर पळत जाऊन एस. टीच्या लाईनला उभे राहण्यास सांगितले व मी मातोश्री व सामान घेऊन एस टीच्या लाईनपाशी आलो. ताराबाईंचा नंबर एस. टीच्या लाइनला बराच खाली लागला होता. पहाटे कोपरगावला येणाऱ्या प्रवाशांना शिर्डीला घेऊन जाणारी एकच एस. टी असायची व ती खेपा करायची. सुदैवाने आमचा नंबर पहिल्याच एस. टी मध्ये लागला. पण पार पाठीमागच्या सीटस मिळाल्या. सामान कंडक्टरच्या हुकुमानुसार एस. टी च्या डोक्यावर चढवले. शिर्डीला एस. टी पोचली व देवळासमोरच्या मेन रोडवर थांबली तेव्हा अंधारच होता. पण किंचितसे तांबडे फुटू लागले होते. आताप्रमाणे एस. टी स्टँड नसल्यामुळे गाडी मंदिरासमोरच्या मेन रोडवरच थांबायची. गाडी थांबल्यावर काही हमाल लोक गाडी भोवती जमले व एक म्हातारा हमाल गाडीच्या टपावर चढला. मी मातोश्री व ताराबाई गाडीतच आमच्या सीटपाशी तरंगत होतो कारण गाडीत उभ्याने प्रवास करणारे प्रवासी व इतर घाई असलेले लोक उतरत होते. टपावर चढलेला हमाल मोठ्याने ओरडला. "अरे ही वरती कुणाची पेटी उघडी पडली आहे ?" आमची पेटी उघडी पडण्याचा प्रश्नच नव्हता. कारण आमच्या पेटीला मातोश्रींच्या सासऱ्याच्या वेळचे दुर्मिळ भरभक्कम कुलूप लागलेले होते.

तरीपण मातोश्रींनी आज्ञा केल्यावरून मी गर्दीतूनच एस. टीच्या बाहेर पडलो. व टपावर चढलो. वरच्या हमालास कोणती पेटी उघडी आहे हे विचारता त्याने माझ्या मातोश्रींचीच पेटी दाखवली. पेटी उघडी नव्हती. पण कुलूप मात्र उघडले असून कोयंड्यामध्ये लोंबकळत होते. मातोश्रींनी गाडीच्या आतून "आपल्या पेट्या ठीक आहेत ना ?" असे मोठ्याने विचारले तेव्हा मी टपावरूनच "तुमच्याच पेटीचे कुलूप उघडले आहे" असे सांगितले.

माझ्या देखरेखीखाली हमालाने ती पेटी व इतर सामान खाली उतरले. मातोश्रींनी त्यांच्या पेटीची तपासणी केली तेव्हा आतील सर्व सामान व्यवस्थित होते. मग हे कुलूप उघडले कसे वा कोणी ! सबंध प्रवासात ती पेटी अनेक ठिकाणी वाकडीतिकडी हाताळली गेली होती. शिवाय ते कुलूप मुंबईला मातोश्रींनी स्वतः लावले होते व त्यांचा स्वभाव म्हणजे कुलूप चार चार वेळा खेचून बघण्याचा सराव असलेला होता. तेव्हा कुलूप सुरूवातीसच नीट लावले नसेल ही गोष्ट अशक्यप्राय.

तर मग हे कुलूप उघडले कोणी !

अर्थात् श्रीसाईबाबाच मातोश्रींच्या हाकेला धावून आले हे उघडच होते.

# श्रीबाबा आणि आमचा चंदन

— सौ. शुभदा सदानंद चुरी
विठोबा निवास, भंडारगल्ली
लेडी जमशेटजी रोड, माहिम मुं. १६.

● "भक्तिप्रेमातूनच परमार्थाची फलश्रुती होत असते. आपला सूत्रधार गुरु आहे तोच कर्तासवरता आहे, त्याच्या ठिकाणी दृढ श्रद्धा ठेवल्याने तोच आपला उद्धार करतो. हा माझा उपदेश कधीच विसरू नका" हा श्रीसाईबाबांचा उपदेश माझ्या बाबतीत एकदम खरा ठरला. माझी बाबांवर असलेली श्रद्धा हीच नेहमी माझ्या आयुष्यात फार मोठी मोलाची ठरली. लहानपणापासून श्रीसाईबाबांच्या अवतारा बद्दल ऐकत आले होते. माझ्या मनात बाबांबद्दल नितांत श्रद्धा व आदर होता. पण माहेरी असताना कधीच शिर्डीला जाण्याचा व बाबांचे दर्शन घेण्याचा योगच आला नव्हता.

१९६४ च्या ३१ मे ला मी विवाहबद्ध झाले. सासरी बाबांचा एक छोटा फोटो होता. पण मोठ्या दिराच्या घरी सासूबाई तो फोटो घेऊन गेल्या. त्यामुळे आमच्या जवळ बाबांचा फोटो नव्हता. मी नंतर एक छोटा फोटो आणून त्याची पूजा केली.

१९६८ साली आम्हाला आमचे मित्र श्री. मधुकर भाटकर सर्वप्रथम शिर्डीला घेऊन गेले. ते दरवर्षी शिर्डीला न चुकता जातात. आम्ही पतिपत्नीं प्रथम नाशिक पाहून येता येता शिर्डीकरून येण्याचे ठरवले. श्री. भाटकर आम्हाला शिर्डीला भेटणार होते. आम्ही नाशिकची भेट संपवून दुसऱ्या दिवशी शिर्डीला सकाळी जाण्याचे ठरविले. पण मला रात्रीच जुलाब व उलट्या सुरु झाल्या त्या सकाळपर्यंत. ज्यांच्या-कडे उतरलो होतो ते लोक जाऊ देईनात मी श्रीबाबांचे नाव घेत होते. मी यजमानांना सांगितले की काही झाले तरी आज शिर्डीत गेलेच पाहिजे. मी आज गेले नाही तर बाबांकडे मला कधीच जाता येणार नाही. शेवटी ह्यांनी माझ्या हट्टाला मान दिला. आम्ही एस. टी.त बसलो. शिर्डी येई पर्यंत मला काहीच झाले नाही. त्यानंतर बाबांनी माझ्याकडून त्यांची पूजाअर्चा करून घेतली. त्यानंतर आम्ही पतिपत्नी दरवर्षी शिर्डीला जातो. मी शिर्डी हे माझे माहेरघरच समजते.

त्यानंतर बाबांच्या चमत्कारांच्या किती तरी गोष्टी आमच्या घरात घडत गेल्या. शिर्डीवरून मी आर्शिवादाचा एक फोटो आणला होता. त्याची पूजा आम्ही घरातील सर्वजण करत होतो. एक दिवस बाबांनी स्वप्नात येऊन सांगितले की उद्या मी तुझ्याघरी येऊन राहणार आहे. दुसऱ्या दिवशी मार्च महिन्याचा सोमवार

होता. दुपारी १२ वाजता आमच्या ओळखीच्या एका बाईने मला त्यांच्या घरी असणारे साईबाबांचे कॅलेंडर आणून दिले. कॅलेंडर मधील बाबा पहाताच मला माझे स्वप्न आठवले. मी मनातून खूप खूष झाले आणि मनात म्हणाले बाबा तुमची लीला अगाध आहे. दुसऱ्याच दिवशी फोटोची फ्रेम करायला दिली. गुरुवारी गुरु-पुष्य होते. म्हणून त्याच दिवशी फोटोची स्थापना केली. त्या दिवसापासून न चुकता आरती पाठकरणे, धूप, प्रसाद होऊ लागला. बाबांच्या पोथीचे सात दिवस वाचन करून गुरुपौर्णिमेला त्यांचा उत्सव करतो. त्या फोटोतले रुप फार वेगळे वाटू लागते. बाबांचा येणारा प्रत्येक भक्त फोटो पाहिल्यावर खूप समाधानी होतो. पूज्य बाबांच्या आगमनाने आमच्या संसारात खूप मोठा बदल झाला.

लग्नाला १३ वर्षे झाली तरी आमच्या घरात मूल नव्हते. कोणत्याही देवाला मी नवस किंवा उपासतापास केले नव्हते. श्रीबाबा व कुलस्वामीवर माझी व माझ्या पतीची पूर्णश्रद्धा होती. आम्ही पूर्ण विचार करून दत्तक घेण्याचे ठरवले. त्यासाठी बाबांचा आशिर्वाद घेण्यासाठी आम्ही शिर्डीला १९७७ मध्ये डिसेंबरला जाण्याचे ठरवले. आमच्या सोबत माझ्या मानस भगिनी पण [ चिटणीसभगिनी ] होत्या. त्या पण साईभक्त आहेत. एस. टी ची तिकीटे काढून आणली होती. कु. प्रतिभाला आव व मूळव्याधीचा त्रास सुरू झाला. ती खूप निराश झाली. मला येऊन सांगू लागली ताई मी काही येत नाही. माझ्यामुळे तुम्हाला त्रास होईल. मी मनात समजले होते की बाबांची ही करामत आहे. कारण हा अनुभव मलाही आला होता. प्रतिभाचा शेवटपर्यंत नकार व माझा तिला होकार—काही होणार नाही बाबांचे नाव घेऊन चल. शेवटी एस. टी. त बसलो. प्रतिभा मनातून खूप घाबरली होती. मी तिला नाशिक येईपर्यंत बाबांची छोटी पोथी वाचायला दिली होती. बाबांच्या कृपेने व तिच्या श्रद्धेने तिला शिरडी येईपर्यंत व नंतरही त्रास झाला नाही. तिला जिद्दीने नेण्यासाठी बाबांनीच मला यश दिले.

आम्ही समाधीवर अभिषेक करीत असता माझ्या कानात " सबूर, सबूर, सबूर " असे तीन वेळा शब्द आले. कारण समाधीवर बसताना मी मनात म्हटले होते बाबा तुम्हीच माझे सर्वस्व आहात तेव्हा मी दत्तक घेऊ की नको ते तुम्हीच सांगा. पुजा आटपली व पुजाऱ्याने सांगितले उठा आणि " बाबां "च्या पायावर डोके ठेवा. मी सर्वप्रथम बाबांच्या जवळ बसले होते. मी उठले व श्रींच्या पायावर डोके ठेवले व मनात बाबा, बाबा म्हणून बाबांचे पाय धरले तोच माझ्या पाठीवर लाल गुलाबाचे टपोरे फुल पडले. पुजाऱ्यांनी ते उचलून माझ्या हातात दिले. मला खूप आनंद झाला. माझ्या नंतर माझे पति नमस्काराला खाली वाकले तो दुसरे पिवळे फुल त्यांच्या डोक्यावर पडले. भटजींनी फुल उचलून त्यांच्या हातात दिले. हा

आम्हा पतिपत्नींना मिळालेला फार मोठा आशिर्वाद होता. माझ्या बहिणींना सकोरीला "उपासनीबाबांचे" दर्शन घ्यावयाचे होते.

हातातील प्रसाद खोलीत ठेऊन व जेवण उरकूण साकोरीला जाण्याचे ठरवले. त्याप्रमाणे खोलीकडे आलो. आमची खोली दुसऱ्या मजल्यावर व जिन्याच्या समोरच होती. तिथे एक बाबांचा आर्शिवाद देतात असा फोटो लावलेला होता. पण आम्ही पुजा संपवून वर आलो तर फोटोत बदल झाला होता. त्या फोटोत आमची इच्छा व बाबांचा होकार दर्शविलेला होता. त्या फोटोत बाबा एका झाडाखाली दगडावर बसले असून त्यांच्या हातातील छोटे मूल ते एका बाईला देत आहेत." तेथे बसलेल्या रखवालदाराला आम्ही विचारले की हा फोटो कोणी लावला तर तो म्हणाला साहेब पहा येवढ्या खोल्या आहेत पण त्या टाकून त्याने ह्या खोलीवरच फोटो लावण्याची आज्ञा झाली आहे म्हणून सांगितले. मी त्या रखवालदाराला सहज विचारले की हा फोटो लावणारी व्यक्ती कोठून आली, तर त्याने शेजारच्या खोलीकडे बोट दाखवले. मी व पती त्याखोलीत जाऊन पाहिले तर कोणीच नव्हते, खोली खाली रिकामी होती. आम्ही ही गोष्ट रखवालदाराला सांगताच तो पटकन म्हणाला बाई तुम्ही जे बाबांकडे मागितलेत ते ह्या फोटोत तुम्हाला स्पष्ट केले आहे. आम्ही दोघे जे काही समजायचे ते समजलो. आनंद खूप झाला होता. ज्या आदराने आम्ही बाबांकडे आलो होतो तेवढ्याच उत्साहाने बाबांनी आम्हांला परत पाठवले होते, सत्यनारायणाची पूजा घालून आम्ही मुंबईला परत आलो.

मुंबईतील सर्व आश्रमाला भेटी देऊन आम्ही कंटाळलो होतो. मुंबईला शिर्डीहून येताच पुन्हा पुत्र शोधासाठी बाहेर पडलो. तोच कोर्टाकडून आम्हांला ५ मुले दाखविण्यात आली. सर्व मुले सारखीच वाटत होती. कोणता आपला म्हणून उचलावा हा प्रश्न पडला. मनात पुन्हा एकदा बाबांची आठवण केली, व म्हटले तूच ह्या प्रश्नातून सोडव. तोच एक प्रकाश किरण जो फक्त आम्हा पतिपत्नींनाच दिसला. तो येऊन त्या मुलाच्या अंगावर पडला. मी चटकन त्या मुलाला उचलून हाच माझा मुलगा म्हणून त्याचे नाव चंदन असे ठेवले. बाबांना चंदन फार प्रिय होते असे मी वाचले होते. म्हणून मी त्याचे नाव चंदन ठेवले.

चि. चंदनला गुरुवार, ५ मार्च १९७७ ला आमच्या घरी आणले. चि. चंदन लहान होता म्हणून शिरडीला तेव्हा जाणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही त्याला वांद्रे येथील कलानगर मधील गुरुप्रसाद या साईबाबांच्या छोट्या ( शिरडीसमान ) मंदिरात नेले. ह्या मंदिराचे चालक आमचे जाधवकाका यांनी ज्याप्रमाणे साईबाबांना "आवो साई" म्हणून हाक मारली होती; त्याचप्रमाणे त्यांनी चंदनला "ये प्रसाद, ये" म्हणून हाक मारून स्वतःच्या हातानी बाबांच्या ओटीत त्याला घातले.

सौ. जाधवकाकींनी त्याला बाबांची उदी व प्रसाद देऊन "चंदनप्रसाद" म्हणून नाव ठेवले. त्या दिवसापासून जाधवकाका व आम्ही सर्वजण चंदनप्रसाद म्हणून हाक मारतो.

चि. चंदनप्रसाद जन्मतःच बाबांचा भक्त आहे. आता तो तीन वर्षांचा झाला. पण मोठ्या माणसासारखा तो बाबांची पूजा करतो. उदी न विसरता सकाळी व रात्री झोपताना लावून झोपतो. स्वतः झोपताना बाबांना नमस्कार करून "बाबा मी झोपतो आता तुम्ही पण झोपा" असे सांगून आपण झोपतो. चि. चंदनप्रसादच्या बाबतीत कोणी वाईट शब्द किंवा इच्छीले तरी पूज्य बाबा त्या व्यक्तिना भोगावयास लावतात. हाच अनुभव आम्हा पतिपत्नीना आहे. आमच्यावर कसलेही संकट आले तरी तो बाबांना सांगतो. श्रीसाईबाबासारखे "मोठे दैवत" आमच्या मागे उभे असताना आम्हाला कोणाची भिती बाळगण्याचे काही कारण नाही.

श्रीबाबांच्या आशिर्वादाने आम्हाला सर्व गोष्टी मिळत गेल्या आहेत. पूज्य बाबांची आमच्यावर अशीच कृपादृष्टी राहो अशी साईबाबांच्या चरणी प्रार्थना.

★

# पुस्तकावरील अभिप्राय

## श्रीसाईमाहात्म्य

[ रचनाकार व प्रकाशक—श्री. रघुनाथ श्रीपाद पुजारी, पेरुगेट मुलांचे भावेस्कूल समोर, ९९२ सदाशिवपेठ, पुणे. पाने १६८ मूल्य ७ रु. ]

पुण्याचे प्रसिद्ध साईभक्त प्रा. र. श्री. पुजारी यांनी या साईपोथीची रचना केली आहे. हेमाडपंत लिखित श्रीसाईसच्चरित या प्रासादिक ग्रंथाच्या आधारेच त्यांनी ही रचना केली आहे. श्रीसाईसच्चरित् या ग्रंथाचे पारायण अनेक भक्तांना कित्येकदा वेळे अभावी शक्य होत नाही. यासाठी एक दिवसाच्या किंवा तीन तासांच्या पारायणासाठी म्हणून एक आटोपशीर अशी पोथी रचना श्री. पुजारी यांनी केली आहे. ही पोथी म्हणजे श्रीसाईसच्चरिताचे सारच आहे. कोणत्याही लेखन कृतीचे थोडक्यात सार आणणे व तेही मूळ अर्थ किंवा संदर्भ यांना धक्का न लावता हे मोठे कष्टाचे काम आहे मग ५३ अध्यायी मूळ पोथीचे २४ अध्यायात सार श्री. पुजारी यांनी मेहनतीने आणले आहे याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक करावेसे वाटते. बाबांच्या ६१ व्या पुण्यतिथीच्या दिवशीच ही छोटेखानी पोथी भक्तांच्या हाती पडली आहे. प्रत्येक साईभक्ताने मूळ पोथी वाचून मग नंतर ही पोथी वाचावी व मूळपोथीचे सार सौख्य अनुभवावे अशी आमची शिफारस आहे.

०००

# श्रीसाईबाबा संस्थानचे-संबंधितांसाठी-
# श्री. क. हि. काकरे यांचे महत्वपूर्ण पत्र

**विषय : शिरडी येथील श्रीसाईबाबांच्या मंदिराची प्रतिकृति बांधणे**

महोदय,

शिर्डीचे महान संत श्रीसाईबाबा ह्यांनी १९१८ साली महासमाधी घेतली हे आपल्यास विदित आहेच. त्यावेळी त्यांचा पार्थीव देह बुट्टीवाड्यात ठेवण्यात आला व त्यावर समाधी बांधण्यात आली, तीच हल्ली समाधी मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

ज्या ठिकाणी एकाद्या संताचा पार्थीव देह ठेवण्यात येतो, त्याच ठिकाणी फक्त त्याची समाधी असते. ती जगामध्ये अन्यत्र कोठेही असणार नाही हे उघडच आहे. म्हणून ज्या ठिकाणी सद्गुरु श्रीसाईबाबांचा पार्थीव देह शिर्डीत ठेवण्यात आला आहे त्या समाधी मंदिरातच त्यांची समाधी असणार व इतरत्र कोठेही ती असणार नाही.

श्रीसाईबाबांचे असंख्य भक्त जगभर पसरलेले आहेत आणि ज्या ज्या वेळी शक्य असेल त्या त्या वेळी ते श्रीबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला येतातच; परंतु जगात विखुरलेल्या साईभक्तांना त्यांच्या त्यांच्या गावातच श्रीबाबांचे दर्शन मिळावे व वाटेल त्यावेळी त्यांची पूजा करता यावी, म्हणून ठिकठिकाणी साईमंदिरे बांधण्यात आली आहेत व त्यांमध्ये श्रीबाबांचा फोटो अथवा पुतळा बसविण्यात आला आहे. साईभक्तीच्या प्रसाराच्या दृष्टीने ही अत्यंत स्पृहणीय अशी गोष्ट आहे; परंतु काही ठिकाणी ही मंदिरे शिर्डीच्या समाधी मंदिराच्या प्रतिकृती बरहुकूम बांधण्यात आली आहेत, तसेच काही ठिकाणी तशा पद्धतीची मंदिरे बांधण्याचे घाटत आहे. ही कृती कायद्याविरुद्ध तर आहेच; परंतु शिर्डीच्या साईबाबांच्या भक्तांस न शोभणारी व काहीशी चमत्कारिक आहे असे म्हणावेसे वाटते.

शिर्डीशिवाय इतरत्र कोठे जर साईबाबांची समाधी बांधण्यात आली तर त्या ठिकाणी श्रीबाबांचा पार्थीव देह ठेवलेला नसल्यामुळे, ते कृत्य श्रीबाबांच्या भक्तांची फसवणूक करणारे व शिर्डी येथील श्रीबाबांच्या समाधीचा अनादर करणारे ठरेल. कारण पुष्कळ काळ गेल्यानंतर भक्तांच्या मनात असा संदेह निर्माण होईल की साईबाबांची खरी समाधी कोठे आहे. सर्व साधारण लोक देखील अशीच शंका घेऊ लागतील; व तो एक संशोधनाचा विषय होऊन बसेल.

श्रीबाबांच्या मंदिरांशी संबंधित असणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांस माझी अशी विनंति आहे की त्यांचे मंदिर हे कोठल्याही प्रकारे श्रीसाईबाबांच्या शिर्डी येथील

समाधी मंदिराच्या प्रतिकृतीप्रमाणे भासते की काय हे त्यांनी तपासून पहावे व तसे ते दिसत असल्यास त्यात योग्य ते बदल करण्यात यावेत म्हणजे ते शिर्डीच्या श्रीसाईबाबांच्या मंदिराच्या प्रतिकृतीप्रमाणे भासणार नाही.

आपल्या मंदिराची सध्याची इमारत कशाप्रकारची आहे व आपण माझ्या प्रस्तुत पत्राची दखल घेऊन काही कार्यवाही केली किंवा काय, हे आपण मला कळविल्यास मी आपला आभारी होईन.

श्रीसाईबाबांचे आशीर्वाद आपणा सर्वांस लाभोत हीच इच्छा.

आपला विश्वासू,
**क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.

## श्री. सदानंद चेंदवणकर यांना 'रत्नभूषण' बहाल माणिकनगर संस्थानाधिपतींनी केलेला भव्य सत्कार

### सुप्रसिद्ध मराठी लेखक व पत्रकार

श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांना 'रत्नभूषण' हा किताब बहाल करण्यात आला आहे. माणिकनगर (हुमणाबाद) येथील दत्तपीठाचे संस्थानाधिपती प. पू. श्रीसिद्धराज माणिकप्रभू यांनी दत्तजयंतीच्या दुसऱ्या दिवशी मंगळवार दि. ४ डिसेंबर ७९–रात्री १२ वाजता भरविलेल्या भव्य दरबारात हा किताब मानपत्ररुपाने देऊन त्यांचा गौरव केला, या बरोबरच श्वेत उपरणे, रौप्य मुद्रा करंडक व पुष्पमाला यांचाही त्यांना यथोचित आहेर केला. याप्रसंगी सुमारे २२ हजारावर स्त्री-पुरुष भक्त मंडळी उपस्थित होती. श्री. चेंदवणकर यांनी लिहिलेल्या 'अवधूत भक्तांची श्रद्धास्थाने' या सुप्रसिद्ध निर्णयसागर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या सचित्र ग्रन्थाबद्दल तसेच त्यांनी आजवर केलेल्या विशिष्ट प्रकारच्या व वैशिष्टयपूर्ण साहित्य आणि समाज सेवेबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे. याप्रसंगी आभारप्रदर्शनाच्या केलेल्या भाषणात श्री. चेंदवणकर यांनी साहित्य, संगीत व आध्यात्मिकता या बाबतीत विशेषत्वाने रुची आस्था व तळमळ दाखविणाऱ्या प. पू. श्रीसिद्धराज माणिक प्रभूंचे व त्यांचे चिरंजीव श्रीज्ञानराज (श्री आण्णासाहेब) यांचे हार्दिक अभिनंदन केले. श्रीसिद्धराज माणिकप्रभू हे दत्तावतारी सत्पुरुष श्रीमाणिक प्रभूंची चौथी पिढी होय.

# शिरडी-वृत्त माहे आक्टोबर सन १९७९

या महिन्यात साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती. दिवाळीचीं सुट्टी असले-मुळे शाळा-कॉलेजच्या मुला मुलींच्या सहलीही बऱ्याच आल्या होत्या. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन** :- १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. रामराव गो. डुकरे. जि. बुलढाणा यांचे कीर्तन झाले.
३) श्रीमती कृष्णाबाई येवलेकर. सातारा यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन** :- १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन, वादन, वगैरे** — १) श्री. शिवाजी माने. २) कु. धन्नवाज. ३) श्री. व्ही. बलसाडा. ४) सौ. मंगला बापट. ५) कु. किशोर बापट. ६) श्री. नोबीन घोष. ७) श्रीमती होमाय पंथगीर. ८) पंढीत जयशाह. ९) श्री. आदिल मिस्त्रि. मुंबई. १०) श्री. रतनसिंग सागर हैद्राबाद. ११) कु. विभावरी द. अंतरकर. वसई. १२) सौ. आर्ति अ. जाधव. वसई. १३) श्री. अशोक भी. जाधव. वसई. १४) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर. मुंबई. १५) डॉ. एम. के. किर्तिकर मुंबई. १६) श्री. पांडूरंग का. चिकटे पुणे. १७) श्री. दीपक बलवंत सिंग मुंबई. १८) सौ. इंद्रजित मुंबई. १९) श्री. अजित गांधी मुंबई. २०) श्री. के. टी. टिकू मुंबई. २१) श्रीमती जयश्री टिकू मुंबई. २२) श्री. विजय टिकू मुंबई. २३) श्री. साईसेवा मंडळी विजयवाडा. २४) कु. जे. मीराबाई आंध्रप्रदेश. २५) सौ. चंद्राबेन भाटे मुंबई. २६) डॉ. व्ही. के. भाटे मुंबई. २७) कु. कृष्णा व्ही. भाटे मुंबई. २८) श्री. साईधाम एकतारी भजन मंडळ मुंबई. २९) कु. वंदना मो. शिरोडकर मुंबई. ३०) श्री. विश्वनाथ मो. शिरोडकर. ३१) श्री. मोहनराव शिरोडकर मुंबई. ३२) श्री. किशोरबाबा चंद्रपूर. ३३) श्री. अहमद पठाण सावळी विहीर. ३४) हनुमान प्रासादिक भजनी मंडळ वालचंदनगर. ३५) श्री. आनंदराव के. आढाव कोपरगाव. ३६) कु. स्वाती र. करंदीकर मुंबई. ३७) कु. विकास वा. किर्लोस्कर कोपरगाव. ३८) श्रीमती मैत्रेयी सानीयाल पुणे. ३९) श्री. वसंतराव वाळुंबकर डोंबिवली. ४०) सुनिलकुमार पी. देशपांडे शिरडी. ४१) श्री. इस्चंदानी व पार्टी भजन मंडळ उल्हास नगर. ४२) कु. प्रतिमा ग. कुलकर्णी बोरीवली ४३) श्री. शामसुंदर हैद्राबाद. ४४) श्री. महादेव वि. खवणेकर मुंबई.

## दिवाळी शनिवार दि. २०-१०-७९

**लक्ष्मी पूजन कार्यक्रम :-** सालाबाद प्रमाणे श्रीसाई मंदिरात सायंकाळी ५ ते ६ वाजे पर्यंत श्रीसाईबाबांचा लक्ष्मीपूजन कार्यक्रम मा. न्यायालयधारक श्री. क. हि. काकरे व मा. व्यवस्थापक अधिकारी श्री. द. चिं. पाठक यांचे इस्ते झाला कार्यक्रमास साईभक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थीत होती. सर्वाना तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. दिवाळीचे दुसरे दिवशी **दिवाळी प्रसाद :-** साईभक्तांना, स्थानिक लोकांना गोरगरिबांना लाडू वाटणेत आले.

**कार्तिक एकादशी :-** सालाबाद प्रमाणे कार्तिक एकादशी निमित्त रात्री कीर्तन झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**विशेष वृत्त :-** महाराष्ट्र राज्याचे धर्मादाय आयुक्त मा. जी. एस. पाण्डे-साहेब यांनी संस्थानला महिना अखेरीस भेट दिली व पहाणी करणेस सुरुवात केली.

**हवापाणी :-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. दरवर्षीपेक्षा यंदा पावसाचे प्रमाण जास्त असले मुळे पाणी पुरवठा व्यवस्थीत आहे थंडीस सुरवात झाली आहे. दुपारी उकाडा व पहाटे गारवा असतो.

**माननीयांच्या भेटी—**

१) मां. श्री. एस. के. रे, मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय ओरिसा

२) मा. श्री. एस. प्रभाकरन, IAS, जिल्हाधिकारी, अहमदनगर जिल्हा

३) मा. श्री. के. बी. जितकर, IAS, माजी जिल्हाधिकारी, अहमदनगर

४) मा. श्री. बी. एन्. आडारकर, (तत्कालिन) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई

५) मा. श्री. एन्. पी. भणगे, प्रांताधिकारी, संगमनेर

६) मा. श्री. ईश्वरराज माथूर, प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७) मा. श्री. मोहिते, पोलीस उपअधिक्षक, अहमदनगर

८) मा. श्री. शंकररावजी काळे, राज्यमंत्री, शिक्षण व सहकार, महाराष्ट्र

९) मा. श्री. बी. सी. गाडगीळ, न्यायाधिश, उच्च न्यायालय, मुंबई

१०) मा. श्री. सावंत, विभागीय उपनियंत्रक RDC, मार्ग परिवहन, पुणे,
११) मा. श्री. धर, वरिष्ठ सैनिकाधिकारी, पुणे
१२) मा. श्री. व्ही. पी. पाटील, दिवाणी न्यायालय, देवरूख, रत्नागिरी
१३) मा. श्री. पाटणकर, न्यायाधिश, पुणे
१४) मा. श्री. बाळासाहेब भारदे, भूतपूर्व अध्यक्ष, खादी ग्रामोद्योग महामंडळ, महाराष्ट्र
१५) मा. श्री. जी. एस. पांडे, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई
१६) मा. श्री. आर. जी. रणदिवे, धर्मादाय उपआयुक्त, पुणे
१७) मा. श्री. के. एस. चंद्रशेखरन, सचिव, ओरिसा सरकार
१८) मा. श्री. साठे, विभागीय प्रबंधक, राज्य मार्ग परिवहन, पुणे
१९) मा. (डॉ.) श्री. ए. डी. गडकरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय, पुणे
२०) मा. श्री. धनजी जगजीवन मॉरिशस
२१) मा. श्री. टी. आर. वरद्राजन, पोलीस उपनिरीक्षक [DIG] पोलीस प्रशिक्षण पथक, महाराष्ट्र
२२) मा. श्री. वीरशेट्टी कुशनूर, सहकार मंत्री, कर्नाटक, बंगलोर
२३) मा. श्री. बाकरे, ना. श्री. सोळंके, उद्योगमंत्री, महाराष्ट्र, यांचे खाजगी सचिव, मुंबई
२४) मा. श्री. एस. पी. राजे, मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र, मुंबई

☆

# श्री साईलीला

## लेखक-कवी स्नेहसंमेलन—शिरडी येथे ९-१० फेब्रुवारी १९८०

महाशय,

शिरडी येथे भरणाऱ्या ६ व्या लेखक-कवी संमेलनास मी हजर राहू इच्छितो / इच्छिते. आपणास हवी असलेली माहिती खाली लिहीत आहे. कृपया मला संमेलनाचे आमंत्रण पाठवावे, ही विनंती.

१) संपूर्ण नाव ( प्रथम आडनाव) ........................................

........................................................

२) संपूर्ण पत्ता ........................................

........................................................

........................................................

३) व्यवसाय ........................................

४) शिक्षण ........................................ ५) वय ............

६) श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आहे / नाही, असल्यास मराठी / इंग्रजी क्रमांक

७) गद्य की पद्य लिहिता ? ....................

८) लेख वा काव्याची शिर्षके (संदर्भासाठी) महिना वर्ष

१.

२.

३.

४.

५.

९) सोबत कुणी येणार आहे काय ? ............ कोण ? ............

[ पती, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण यांपैकी कुणाही एकास आणू शकाल ]

१०) संमेलनात काही ठराव मांडणार ? होय / नाही.

[ ठराव वेगळ्या कागदावर लिहून पाठवा. ]

स्वाक्षरी,